

# सप्तक

संगीता जोशी

# सप्तक

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत. सूचना. टीका. विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सप्तक

कथासंग्रह

संगीता जोशी

ई साहित्य प्रतिष्ठान

# सप्तक (कथासंग्रह)

संगीता जोशी

A-1. भूषण अपार्टमेंट.

11/2. कर्वेनगर. कमिन्स कॉलेजजवळ. पुणे 411052

Phone : 9665095653. 7722006363

sanjoshi729@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य. चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary. dramatic. musical. sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction. damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २६ सप्टेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# संगीता जोशी



ई साहित्य प्रतिष्ठानतर्फे प्रसिद्ध होणारे संगीता जोशी यांचे हे अकरावे पुस्तक. त्याशिवाय त्यांची इतर अनेक प्रकाशनांची छापील पुस्तके आहेतच.

सांप्रत मराठी कविता आणि विशेषतः मराठी गझलच्या रसिकांना संगीता जोशी यांची नव्याने ओळख करून द्यायची गरज नाही. मराठीतील त्या पहिल्या मराठी गझलकारा. २००४ सालच्या अमरावती येथील मराठी गझल संमेलनाच्या त्या अध्यक्षा होत्या. त्यांची आजवर प्रसिद्ध झालेली म्युझिका. वेदना संवेदना. चांदणे उन्हातले. मराठी गझल. नजराणा शायरीचा भाग १ व २. ती भेटते नव्याने अशी अनेक पुस्तके रसिकांच्या मनात स्थान करून आहेत. अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. अनेक सभा. मैफ़ली व संमेलनांतून त्यांनी आपले काव्य सादर केले आहे. टिव्ही मालिका. ध्वनीमुद्रिका यांतून त्यांची गीते प्रसिद्ध झाली आहेत. गेली पन्नास वर्षांहून अधिक काळ त्या लिहीत आहेत.

या सर्व सन्मानांमध्ये गुंतून न रहाता त्यांचा लेखनप्रवास सुरूच आहे. आणि त्यासाठी त्या नवनवीन माध्यमांचा मागोवा घेत असतात. संगीता जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली इतकी पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. आताही शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर ( ९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (बारा पुस्तके), शुभांगी पासेबंद (सात पुस्तके), अविनाश नगरकर (४ पुस्तके),

डॉ. स्मिता दामले (सात पुस्तके), डॉ. नितीन मोरे (१७ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (दोन), अशोक कोठारे (८ हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), डॉ वृषाली जोशी ( ८ पुस्तके), विनीता देशपांडे (४ पुस्तके) उल्हास हरी जोशी(५), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (४) असे अनेक लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

# संगीता जोशी यांची ई साहित्यतर्फे प्रकाशित पुस्तके

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ye_chamanajar_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/urdu_shayari_2_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/ney_kuthehi_vadala_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mddb_dattopant_deshpande. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/bsbb_sangeeta_joshi. pdf

http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/gajhalaayan_sangita_joshi. pdf


http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/mulyakatha_1_sangeeta_joshi. pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/amulyakatha_sangeeta_joshi.pdf


http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chhandomayee_kavita_sageeta_joshi.pdf









नेऽ कुठेही
वादळा
– संगीता जोशी



उर्दू शायरीचा आस्वाद
भाग १
संगीता जोशी



उर्दू शायरीचा आस्वाद
भाग २
संगीता जोशी


संगीता जोशी
बिछडे सभी बारी बारी
कैफ़ी
साहीर


संगीता जोशी
ये
चमनजार


संगीता जोशी
गझलायन


संगीता जोशी
मूल्यकथा


संगीता जोशी
मी
दत्तोपंत देशपांडे
बोलतोय


संगीता जोशी
अमूल्यकथा

# अर्पणपत्रिका

हे सप्तक सर्व साहित्यप्रेमी वाचकांना अर्पण

संगीता जोशी

# सप्तक

ऋण

मी एक अपंग

सुमा

निर्णय

प्रवाह

स्वामी

डबे

या संग्रहातील सर्व कथा काल्पनिक असून यात उल्लेख केलेली स्थळे, व्यक्ती व प्रसंग यांचा वास्तवातील कोणाशीही संबंध नाही. तसा तो आढळल्यास निव्वळ योगायोग समजावा.

# ऋण

आता फक्त चोवीस तास राहिले.. फक्त आजचा दिवस.. एकच दिवस.. याच दिवसाची त्याने उत्कंठेने वाट पाहिली होती. समजायला लागल्यापासून आणि स्वतःचं जीवनरहस्य अर्धवट कळल्यापासून ह्या एकाच दिवसाची तो वाट पाहात होता.. आणि तो दिवस आता जवळ आला होता.. नव्हे येऊन ठेपला होता. उद्या त्याचा वाढदिवस. 18 ऑक्टोबर. उद्या त्याचं वय 18 वर्षे पूर्ण होणार..! आणि मग..

पण एवढी कसली उत्कंठा होती यशच्या मनात? अठरा वर्षे पूर्ण होणार व तो फोरव्हीलरचं लायसेन्स घेऊ शकणार, म्हणून का? पण वाहन चालविण्याची हौस तर सोळाव्या वर्षी टू व्हीलर मिळाली तेव्हाच पूर्ण झाली होती. अठरा वर्षांनंतर मतदान करता येणार असल्याची कसली आलीय उत्कंठा? त्याच्या दृष्टीने राजकारण म्हणजे चिखल होता. त्याला त्यात अजिबात रस नव्हता. तरीही तो 18 व्या वाढदिवसाची इतक्या उत्कंठेनं का वाट बघत होता? कारणही तितकंच गंभीर होतं.. नुसती उत्कंठा शमणार होती इतकंच नाही, तर त्याचं आयुष्यच एक वळण घेणार होतं.. कुठलं वळण? काय असणार होतं त्या वळणावर? तिथून पुढे रस्ता होता की पुढे डेड-एण्ड होता? .. तसं असलं तर तो मागे तरी कसा फिरणार होता? काय करणार होता? .. असंख्य प्रश्न.. दिवस त्याने विचार करण्यात घालवला अन् रात्र जवळजवळ जागूनच काढली.

पहाटे पहाटे त्याचा डोळा लागून गेला.. पण मनातल्या उत्कंठेपोटी काही वेळातच जाग आली. तो कपाटापाशी गेला. आईनं दिलेलं ते बंद पाकिट त्यानं काढलं. आईच्या प्रेमामुळेच तिला दिलेलं वचन त्यानं मोडलं नव्हतं. नाहीतर तो ते आधीच फोडू शकला असता. आता काही क्षणातच त्याच्यासमोर रहस्य उलगडणार होतं... न राहवून त्यानं ते पाकिट फोडलं. आत

त्याच्यासाठी एक 10-12 ओळींचीच चिठ्ठी होती व सोबत आणखी एक बंद पाकिट.. चिठ्ठीत लिहिलं होतं---

'बाळ यश, मला माहीत आहे, तू उत्सुकतेनं पाकिट फोडशील.. पण तुझ्या प्रश्नाचं उत्तर मी नाही रे देऊ शकणार? किरण वडनेरे नाहीत; मग तुझे वडील कोण, त्यांचं नाव काय? हेच आहेत ना तुझे प्रश्न? पण त्यासाठी तुला आणखी थांबावं लागेल. '

वाचता वाचता यश थांबला. कपाळावर आठ्या पडल्या.. म्हणजे काय? आईचे अनेकांशी..? ती माझ्या वडिलांचे नाव का सांगू शकत नाही? यशचं मन चिठ्ठी पूर्ण वाचण्यापूर्वीच पेटून उठलं. मग माझं नाव यश किरण वडनेरे असं का लावलं? कुठे आहेत किरण वडनेरे? मला त्यांना भेटायचंय... यशचं मन धावत होतं.

मधे एक-दोन क्षणच गेले असतील.. तेवढ्यात यशच्या मनात काहूर माजलं.. तो पुढे वाचू लागला.. ' मी नाव का सांगू शकणार नाही, असा प्रश्न पडला ना तुला? त्याचं उत्तर कळण्यासाठी तुला डॉ. खांबेटे यांना भेटावं लागेल. मला माहीत होता, तो त्यांचा पत्ता मी दिला आहे. त्यांची भेट घे व त्यांच्याशी बोल. तुला सारं काही समजेल. मला खात्री आहे तू मला समजून घेशील. सोबतचं पाकिट डॉक्टरांसाठीच आहे ते त्यांना दे. सगळं कळूनही मी तुझी अपराधी आहे असं तुला वाटत असेल तरतू मला क्षमा कर.. तुझी आई. सहीखाली खूप जुनी तारीख होती.

पाकीट घडी करून खिशात ठेवण्यापूर्वी यश ने तो फोन नंबर लावला.

'डॉक्टर खांबेटे का? ''रॉंग नंबर! ' म्हणून फोन बंद झाला. दोन तीन वेळा यशनं काळजीपूर्वक नंबर लावला. आता समोरची व्यक्ती वैतागून म्हणाली, 'एऽऽ, तुला किती वेळा सांगितलं रॉंग नंबर म्हणून? ठेव आता..! '

यश मनातून चिडला. आता पत्ता शोधणं भाग होतं. त्यानं ऍक्टिवा काढली. शहराच्या जुन्या भागातला पत्ता होता तो. या भागात राहणाऱ्या डॉक्टरकडे का आली असेल आई? आणि

यांना कसं माहित असेल माझं जन्म-रहस्य? ते आईचे नातेवाईक होते की कोण होते? पण आम्हाला तर कोणी नातेवाईकच नव्हते! तसं आई सांगायची. आई म्हणायची तिचे आई-वडील तिच्या लहानपणीच गेले.. मला मामा-मावशीही नाही.. कधी काका.. आत्त्या असल्याचंही ऐकलं नाही.. यशच्या मनात विचारांचा गुंता वाढत होता...

------आणि अचानक समोर पाटी दिसली.. अश्विनी हॉस्पिटल. डॉ. खांबेटे.. यश एकदम उल्हसित झाला. आत शिरताच काउंटरपाशी जाऊन त्यानं विचारलं,

‘मला डॉक्टर खांबेटेंना बेटायचंय; कुठे आहेत ते? ’

जोरजोरात श्वास चालल्यामुळे त्याचे शब्द धाप लागल्यासारखे येत होते.

‘अरे, जरा हळू! ’ समोरची प्रौढ सिस्टर म्हणाली. ‘डॉक्टर पराग तुला संध्याकाळी भेटतील.. ’

‘ते नाहीत हो! मला एन. पी. खांबेटे हवे आहेत. कुठैत ते? ’

‘मोठे डॉक्टर आता हॉस्पिटलला येत नाहीत. त्यांचा मुलगा डॉक्टर पराग. तेच बघतात सगळे पेशंट.. पण तुला काय होतंय? ’

‘मला काही होत नाही हो; मला काही करून त्या डॉक्टरांना भेटायचंय..’ यश पुढे अडखळत राहिला. ‘मला प्लीज सांगा, डॉ. एनपी खांबेटे मला कुठे भेटतील? फार महत्त्वाचं काम आहे हो! मला त्यांचा घरचा पत्ता द्या ना. त्यांची भेट घेणं फार जरूरीचं आहे.’

काकुळतीला येऊन यश सिस्टरला विनवीत होता. क्षणभर यशच्या मनात आलं, ‘ते आहेत ना? की.. देवाघरी..’

पण तेवढ्यात सिस्टरनी एक कार्ड त्याच्या हातात दिलं. त्याला एकदम हायसं वाटलं. त्यावर डॉक्टरांचा घरचा पत्ता होता.

यशची ऍक्टिवा बंगल्याच्या बाहेर उभी राहिली. लोखंडी गेटची कडी काढून तो आत जाणार, तेवढ्यात मोठा कुत्रा जोरजोरात भुंकू लागला. पण सुदैवाने कुत्रा साखळीने बांधलेला होता.

कुत्रयाच्या भुंकण्याने एक गृहस्थ बाहेर आले. पांढराशुभ्र पायजमा, पांढरा हाफ कुर्ता, पायात सँडलवजा सपाता, गोरापान चेहरा व डोळयांवर सोनेरी चष्मा.. हेच डॉक्टर खांबेटे असावेत.. यशने ताडलं.. त्यांनी कुत्र्याला शांत केलं..

‘आपणच डॉक्टर खांबेटे नं? .. सीनियर खांबेटे.? ’यशने आनंदूनच विचारले होते.

‘होऽ; मीच. काय काम आहे? ’ हे बोलतांनाच यशला पाहून त्यांच्या मनात कुठले तरी संदर्भ जुळत चालले होते. यश ने नाव सांगताच, कॅमेऱ्याचं दृश्य फोकस व्हावं तसा त्यांना भूतकाळ आठवू लागला.. ते मनात म्हणाले.. हा तर अगदी वडलांसारखाच हँडसम, रुबाबदार दिसतोय..

‘मला तुम्हालाच भेटायचंय. माझ्या आईनं हे पत्र दिलंय तुमच्यासाठी. माझ्या पाकिटात हे दुसरं पाकिट होतं. मला आईने फक्त तुम्हाला भेट एवढंच लिहिलं होतं.. ’

यशनं बंद पाकिट त्यांच्यासमोर धरलं..

‘डॉ. एन. पी. खांबेटे’ डॉक्टरांनी वरचं नावही मनात वाचलं. अक्षर परिचित असावं असे भाव त्यांच्या चेहऱ्यावर होते. पाकिट फोडून ते पत्र वाचू लागले व यशला वऱ्हांड्यातून आत बोलावलं.

‘बस; तू यश ना? यश किरण वडनेरे? ’

‘होऽ; मी यश. माझी आई तुमची पेशंट होती का? तुम्ही नातेवाईक आहात का आमचे? की..? ’

‘थांब, थांब, सगळं सांगतो.. तुझा जन्म माझ्याच हॉस्पिटल मधे झालाय्.. म्हणजे तुझी आई माझी पेशंटच होती. अधून मधून यायची भेटायला. तुला मी फार लहान पाहिलं होतं. त्यानंतर आज इतक्या वर्षांनी पाहतोय्.. पण तू एक दिवस येणार हे मला माहीत होतं.. थोडं थांबून ते पुढे म्हणाले, ‘तुझ्या आईचा अपघाती मृत्यू झाला, हे पेपरमधे वाचण्यात आलं होतं माझ्या काही वर्षांपूर्वी.. पण मग तुझ्याकडे कोण पाहात होतं? ’

‘आईनं मला हॉस्टेललाच ठेवलं होतं. पैशांची व्यवस्थाही तिनंच करून ठेवली होती. ती असल्यापासून, लहानपणापासूनच मी ऍडफिल्ममधे कामं करायचो. आताही करतो, कॉलेज सांभाळून. मॉडेलिंगमधे बरा पैसा मिळतो; त्यामुळे चाललंय व्यवस्थित. आमची दोन खोल्यांची जागा, आईनं घेतली होती; तिथंच मी आता राहतो.. मित्राचे वडील मार्गदर्शन करतात.. ’

यशला अशा गप्पांमधे रस नव्हता.. तो उतावीळ झाला होता. त्यामुळे त्यानं स्वतःबद्दल भराभर सांगून टाकलं.

‘सांगा नं; माझे वडील किरण वडनेरे? कुठे असतात ते? तुम्ही ओळखता त्यांना? ते मला भेटतील? पण इतकी वर्षं त्यांनी का नाही आमचा शोध घेतला? ’

‘ऐक; सांगतो सगळं. आता तू अठरा पूर्ण झाला आहेस, तेव्हा तुला ही माहिती कळणं हा तुझा कायदेशीर हक्कच आहे. आधी तुझ्या आईबद्दल सांगतो. तुझ्या आईचं मूळ नाव मनीषा. हे नाव तुला अपरिचित असणार कारण तिने पुढे सोयीसाठी नाव बदलून घेतलं. बिचकू नकोस. मी सांगतोय् ते लक्षपूर्वक ऐकून घे. तुझी आई एका अनाथालयात वाढली. तुला नातेवाईक नाहीत याचं कारण तुझ्या आईला जन्मतःच, तिच्या आईनं रस्त्याच्या कडेला टाकून दिलेली होती. याचं कारण काय असेल ते असो. कुणीतरी ते बाळ अनाथालयात पोहोचवलं. ’

यशच्या चेहऱ्यावरचे भाव पटपट बदलत होते.. तो व्याकुळ झाल्यासारखा वाटत होता. डॉक्टर पुढे म्हणाले,

'अनाथालयात तिचं नाव मनीषा ठेवलं होतं. त्या गावात ती मोठी झाली. थोडीफार शिकली.. फार शिकली नसली तरी तिला वाचनाचा छंद होता. त्यामुळे चतुर होती. मुळात हुषार होती. इथे शहरात आल्यावर माझ्या हॉस्पिटलमधे कामाला लागली. कामाला एकदम चोख.. कधी कंटाळा नाही.. चुकारपणा नाही.. तिला कोणीच नसल्यामुळे हॉस्पिटलमधेच रहायची. बाळंतिणींची सेवा करायची.. '

थोडं थांबून ते पुढे सांगू लागले, 'हे सगळं ऐकून तू नर्व्हस झालेला दिसतोस; पण.. आता बाकीचा इतिहास जाऊ देत, मुद्द्याचं ते सांगतो. एकदा मला म्हणाली,

'डॉक्टर, मला देखील मूल हवं असं वाटतं.'

'मग लग्न करून टाक. मी पाहतो तुझ्यासाठी स्थळ..'

'नको डॉक्टर; मी अशी अनाथालयात वाढलेली; ना आगा; ना पीछा. ना घर ना घराणं. कोण करणार माझ्याशी लग्न? त्यापेक्षा.. ' ती अडखळली.

'त्यापेक्षा काय? ' मी म्हणालो; 'हां दत्तक घेऊ शकतेस तू'

ती म्हणाली, 'पण दत्तक घेतलं तर माझ्या पोटचं, माझ्या रक्तामासांचं मूल कसं मिळेल मला? मी. अशी.. निदान मूल तरी माझं स्वतःचं असावं.. तुम्ही इतर डॉक्टरांशी बोलतांना मी ऐकलंय.. इनसेम्नेशन की काय ते.. त्या पद्धतीनं मला माझं मूल. '

'मला हे अनपेक्षित होतं. मी म्हटलं मी विचार करतो. '

असं बोलणं झाल्यावर ती मला अधून मधून विचारायची. ' डॉक्टर तुम्ही काय ठरवलं माझ्या बाबतीत? '

'मनीषा, तू वाढवणार कसं त्या मुलाला? पैसा.. अडका..'

‘ मी तुमच्याकडे माझा पगार जमा करत असतेच.. मूल झाल्यावर तुम्ही मला एखाद्या दुसऱ्या लांबच्या हॉस्पिटलमधे नोकरी लावून द्या. नाव बदलून घेईन व तिकडेच राहीन. बाळाला शिकवीन मोठं करीन. या जगात माझ्या रक्ताचं कोणीतरी तर असेल..! ’

यशशी ते बोलू लागले; ‘शेवटी मी तिचं ऐकायचं ठरवलं. कारण मातृत्व हा प्रत्येक स्त्रीचा हक्क असतो.’

यश मन लावून ऐकत होता. त्याला सगळं धक्कादायकच होतं. डॉक्टर सांगत होते,

‘ठरल्याप्रमाणे एका विश्वासातल्या व्यक्तीशी बोललो. इतर डॉक्टरांचाही सल्ला आधीच घेतला होता. अत्यंत गुप्तता पाळून आम्ही इन्सेम्नेशन चा यशस्वी प्रयोग केला. तुझी आई प्रेग्नंट राहिली. एक लक्षात घे तू. यात तुझ्या आईनं व्यभिचार केला असं होत नाही. ही प्रेग्नन्सी ही पूर्ण मेडिकल सायंटिफिक गोष्ट आहे. या प्रेग्नन्सीसाठी कुणाचं सीमेन (वीर्य) वापरलं हेही तुझ्या आईला माहीत नाही.. नव्हतं. तशी जरूरच नसते. ज्या व्यक्तीनं वीर्यदान केलं तिलाही हे कोणासाठी वापरलं जाणार आहे हे माहीत नसतं. दोन्ही व्यक्तींचा यात काही संबंध नसतो. हा केवळ एक लॅबमधे केलेला प्रयोग असतो. ’

डॉक्टर बोलता बोलता थांबले. यशच्या चेहऱ्यावरचे भाव थोडे संभ्रमित, थोडे कुतूहलाचे असे संमिश्र होते.. तो निःशब्द होता.

‘कळलं ना? तुझ्या आईनं तुला मिळविण्यासाठी एक दिव्यच केलं होतं ते? .. आणि किरण वडनेरे म्हणशील तर अशी कोणतीच व्यक्ती अस्तित्वात नाही. तुला शाळेत घालतांना प्रश्न येईल याचा विचार करूनच आम्ही जन्मदाखल्यातच हे नाव निश्चित केलं.. आणखी प्रश्न उद्भवू नयेत म्हणून तिनं इथून दूरच्या उपनगरात हॉस्पिटलमधे नोकरी धरली सुनीता वडनेरे नावानं आणि तुला एकटीच्या हिंमतीवर वाढवलं.. खूप जिद्दीनं.. खूप प्रेमानं.. ’

'पण डॉक्टर, किरण वडनेरे कुणीच नसतील, तर मला नाही का कळू शकणार, माझे वडील कोण ते? '

'अठराव्या वर्षानंतर, ते कळण्याचा अधिकार तुला आहे यात शंका नाही. पण त्या वडिलांचा तू वारस होऊ शकणार नाहीस. किंवा त्यांच्या संपत्तीवरही तुला हक्क सांगता येणार नाही. '

'ते जाऊ दे; ते मला काही नकोय; पण तुम्ही सांगाल तेच माझे वडील कशावरून? याचा काही पुरावा आहे का? '

'तर! पुरावा आहे तर! त्या प्रयोगाच्या सर्व नोंदी आहेत माझ्याकडे. त्या व्यक्तीची संमती, त्यांच्यावर लागू असलेल्या अटी, साक्षीदार, वकील, मी स्वतः प्रयोगकर्ता.. असे सर्व लेखी पुरावे माझ्याकडे आहेत. एक सांगतो, की हा माझाही पहिलाच प्रयत्न होता; पण मनीषा प्रयोगासाठी उपलब्ध झाल्यामुळे, पुढे मी हे समाजकार्य म्हणूनच करायचं ठरवलं. त्यानंतर मी मूल न होणाऱ्या अनेक जोडप्यांवर प्रयोग केले. अर्थात यात अत्यंत गुप्तता आवश्यक असते. ज्यांच्या बाबतीत नवऱ्याऐवजी दुसऱ्या पुरुषाला इनव्हॉल्व्ह करावं लागतं, अशाही सर्व नोंदी माझ्याकडे आहेत. पण हे संबंधित सर्व व्यक्तीच्या संमतीने होत असतं. तुझ्या केस सारखंच.. अठरा वर्षांपुढे मूल समजून घेऊ शकतं असं गृहीत धरून, मुलाने मागणी केल्यास त्याला खऱ्या वडिलांचं नाव कळावं अशी कायद्यात तरतूद आहे.. म्हणून.. '

'मग सांगा नं त्यांचे नाव.. '

'थांब.. घाई नको; आधी मला त्यांचीही संमती घ्यावी लागेल.. तू पढच्या आठवड्यात फोन करून ये; मग सगळं होईल.. 'डॉक्टर खांबेटेंकडून फोन नंबर घेऊन यश परत निघाला.. अजून इतक्यात त्याची हुरहुर संपणार नव्हती..

काही दिवस पुन्हा तळमळत गेले. आईच्या प्रेमाची आठवण होऊन रडण्यातही गेले. ‘किती धाडसी निर्णय होता तिचा! प्रवाहाविरुद्ध पोहण्याचा! जगाने बोल लावू नये म्हणून स्वतःचे नाव, ओळखपुसून टाकण्याचा! अपत्य प्रेमासाठी किती त्याग केला तिनं..! मी मात्र क्षणभर का होईना तिच्याबद्दल वाईट विचार केला! चुकलंच माझं.. आणि माझे वडील? कोण असतील ते? त्यांनी संमती नाही दिली तर? मला त्यांचं नावही अज्ञातच राहील.. ’यश विचार करून थकून गेला.

अखेर आठ दिवसांनी संपर्क साधल्यावर खांबेटे डॉक्टर त्याला ‘ये’ म्हणाले. पण म्हणाले, ‘फारशा अपेक्षा ठेवू नकोस. ’

यशला वडिलांचे नाव एकदाचे कळले होते. पत्ताही मिळाला होता. यश त्या पत्त्यावर पोहोचला तेव्हा दुपार झाली होती. दारावरची बेल वाजविली तर नोकराने दार उघडले. नोकर काहीसा गोंधळलेला दिसला. म्हणाला, ‘सर्वजण हॉस्पिटलला गेले आहेत. साहेबांची प्रकृती बिघडली; बायपास का काय ते आप्रेशन आहे. घरी कोणी नाही. ’

यश पुन्हा हॉस्पिटलचा पत्ता घेऊन तिकडे निघाला. मनात म्हणाला माझी अन् वडिलांची भेट व्हावी ही नियतीची इच्छाच नाही का? तो चौकशी करून आयसीयू जवळ पोहोचला. काचेतून त्याला नळया लावलेला पेशंटचा-आपल्या वडिलांचा- चेहरा दिसत होता. अस्पष्ट.. पण तरीही तो खूष होता. आपण त्यांचंच रूप घेतलंय हे त्याला कळलं होतं. नातेवाईकांची धावपळ त्याला दिसत होती. अंदाजाने तो तिथल्या बाईंजवळ पोहोचला.

‘कसे आहेत विनय राणे साहेब? ’ मिसेस राण्यांनी त्याच्याकडे चमकून पाहिलं. राणेंना एटॅक येण्यापूर्वीच डॉ. खांबेटेंचा फोन आलेला मिसेस राण्यांना माहीत होता. व त्यांना सर्व सत्य राणेंकडून समजले होते.. पण ही वेळ काही ते बोलण्याची नव्हती. मिसेस राण्यांकडून काही रिस्पॉन्स न आल्याने यश ने विचारले,

'काही मदत हवी आहे का? '

'मदत ना? हो.. ह्यांना रक्ताची बाटली हवी आहे. इथल्या बाटल्या संपल्याहेत, या ग्रुपच्या. दुसरीकडे माणसं गेली आहेत.. पण.. '

'कोणता ग्रुप आहे त्यांचा? ' यशनं विचारलं.

'खूप रेअर आहे.. ओ निगेटिव्ह.. '

'अरे! मग काळजी करू नका. माझाही ओ-निगेटिव्हच आहे. मी देतो ब्लड लगेच! '

मिसेस राण्यांनी मुलीला सांगितलं, 'रूपा, देवानंच धाडलंय याला. डॉक्टरकडे ने त्याला. रूपा त्याला त्या सेक्शन मधे घेऊन गेली. ब्लड देण्याच्या कॉटवर झोपून यश विचार करत होता. नियतीच्या योजनेची त्याला गंमत वाटली. त्याहीपेक्षा त्याला विलक्षण आनंद झाला. काहीतरी अनामिक असं समाधान त्याला मिळत होतं. खूप खूप शांत वाटत होतं.

'ज्यांनी मला जीवन दिलं, त्यांनाच रक्तदान करून जीवन देण्याची व अशा प्रकारे त्यांचं ऋण फेडण्याची संधी मला नियतीनं दिली, याबद्दल तिचे आभार तरी कसे मानायचे? 'तो मनात म्हणाला.

आता त्याला कोणालाही भेटण्याची गरज वाटत नव्हती. त्याची उत्कंठा.... हुरहुर ...सारंकाही शमलं होतं.... आपल्याला पाहून मिसेस राण्यांना व रूपाला काय वाटलं असेल याचाही विचार करण्याची त्याला गरज नव्हती....

आता फक्त डॉ. खांबेटेंना एक फोन करायचा होता; बस्...!

****

# मी एक अपंग

नेहमीप्रमाणे शाळा भरली. ‘बावीस.. तेवीस.. क्रमांक तेवीस.. ’ मी दोनदा उच्चारून तिसऱ्या वेळी नाव उच्चारले; ‘विराग.. ’ काही क्षण स्तब्धतेत गेले. मी पुढचे नंबर्स सवयीने घेत राहिले. व ‘पी’ मांडत राहिले. पण मनात येत होते, आजही हा मुलगा गैरहजर! दोन महिने झाले शाळा सुरू होऊन. सुरुवातीचे काही दिवस सोडले तर नियमित हजरच नाही हा मुलगा. अधून मधून धूमकेतूसारखा उगवतो. गैरहजेरीबद्दल विचारलं तर गप्पच बसतो. क्वचित एखादं कारण सांगतो. बहुधा पटणारं. ‘आता नक्की नाही शाळा बुडवणार’ असं खाली मान घालून पुटपुटतो, झालं..

असंच या दोन महिन्यात घडत आलंय्. मी यावेळी ठरवलं की आता मात्र त्याचे पालक आल्याशिवाय पिच्छा सोडायचाच नाही. नववीचे वर्ष म्हणजे पुढच्या वर्षाची तयारी. नववीपासून लक्ष दिलं आणि शिक्षकांनी मेहेनत घेतली तरच दहावीचा निकाल चांगला लागणार. त्यामुळे आम्ही सर्व शिक्षक नववीच्या वर्गातल्या मुलांबाबत फार जागरूक असतो. यंदाची माझी ‘अ’ तुकडी चांगल्या हुषार विद्यार्थ्यांची होती. या तुकडीत आला त्याअर्थी विराग साठ टक्क्यांच्या पुढचा विद्यार्थी असावा हे मला माहित होतं.

‘अग, गोसावी, चिटे आठवीत तुझ्याच वर्गात होता ना? फारच अनुपस्थित असतो तो. पूर्वीही असंच करायचा का? ’ मी मधल्या सुटीत आधीच्या त्याच्या वर्गशिक्षिकेला विचारलं. ती म्हणाली, ‘पहिल्या टर्मला व्यवस्थित होता; पण पुढल्या टर्मला पुढंपुढं असं करायला लागला तो. मात्र गैरहजर राहिला तरी पास व्हायचा तो. सर्व विषयात. वार्षिकला सुध्दा.

असेच काहीसे बोलणे व्हायचे. माझ्या मनात आलं, मुलं नववीत आली की त्यांना शिंगं फुटतातच. कुमारवयाची सुरुवातच ती. या वयात मुलांना फार जपावे लागते. त्यांच्यात होणारे शारीरिक आणि मानसिक बदल पालकांनी च शिक्षकांनी जाणीवपूर्वक निरखावे लागतात. त्यांची दिनचर्या, त्यांचे मित्र, त्यांची सुप्त आकर्षणे या सगळयावरच बारकाईने लक्ष ठेवावे लागते. कारण या वयातच मुलगे बिघडण्याची शक्यता असते. आयुष्याच्या याच वळणावर पालक-शिक्षकांनी त्यांना योग्य दिशा दाखविली, भावभावनांचे उन्नयन करण्याचे अप्रत्यक्ष प्रयत्न केले तर मग काळजी नसते. म्हणून विरागकडे जरा जास्त लक्ष द्यायचं मी ठरवलं. तशी अधून मधून दांड्या मारणारी इतर मुलेही होती; पण अनेक वर्षं अनेक विद्यार्थी नजरेखालून गेले की कोणाच्या बाबतीतवेगळेपण दिसतंय हे चांगल्या शिक्षकाला नक्कीच कळतं. त्या दृष्टीने विराग ही एक ‘केस’ होती.

आणखी तीन दिवसांच्या गैरहजेरीनंतर तो आला. पहिला तास संपल्यावर मी त्याला बाहेर बोलावलं.

‘विराग, तू चार दिवस कुठे होतास? ’

‘घरी होतो’ त्यानं खालच्या मानेनं उत्तर दिलं.

‘मला शब्दशः उत्तर नकोय्, मी गैरहजेरीचं कारण विचारतेय्’ मी जरा रागावल्यासारखं करून विचारलं.

पुन्हा शांतता. खाली मान घालून तो उभा. मीच विचारलं,

‘आजारी होतास? ’ ‘नाही’ विरागनं खोटं बोलण्याचा प्रयत्न केला नाही याचं मला त्यातल्यात्यात बरं वाटलं.

मी आणखीही खोलात शिरून विचारण्याचा प्रयत्न केला. पण काहीच निष्पन्न झालं नाही. शेवटी मला माझा अधिक वेळ देता येणं अशक्य झाल्यानं मी त्याला वर्गात जायला सांगितलं..

त्यादिवशी सेक्रेटरीने मला पाचव्या तासानंतर येऊन सांगितलं, ‘मिस, विराग मधल्यासुटीनंतर शाळेत आला नाही; मी त्याचं नाव लिहिलंय् पळून जाणाऱ्यांच्या यादीत. ’

‘बरं पाहते मी उद्या’ इतकंच मी बोलले.

दुसऱ्यादिवशी विराग येणारच नाही असा माझा कयास होता; पण तो आला होता.

तास संपल्यावर मी त्याला पुन्हा अत्यंत गोडीने, कळकळीने विचारलं,

‘विराग, तू का असं वागतोस? तुला शाळा, अभ्यास हे काही आवडत नाही का? ’

‘तसं नाही, मिस, .. ’

‘तू एवढी शाळा बुडवतोस, तरी तुझे मार्क बरे आहेत. म्हणून तू ‘अ’ तुकडीत आहेस. आणखी नीट अभ्यास केलास, नियमित शाळेत आलास तर तुझा नंबर वर जाईल. ते तुला नकोय् का? ’

‘.. मला अभ्यास करायचाय्.. ’

‘हे बघ, नुसतं असं तोंडी कबूल करून पुन्हा तसंच वागत राहिलास तर काय उपयोग? ’ तो खाली बघत मान डोलवतराहिला. मीच पुढे म्हटलं,

‘असं कर, उद्या तू तुझ्या पालकांना घेऊन ये. मला त्यांच्याशी बोलायचंय. पालक म्हणजे आई किंवा वडील. दुसरं कोणी म्हणजे मोठा भाऊ वगैरे चालणार नाही. ’

‘वडील नाहीत.. ’ तो म्हणाला.

माझा स्वर मवाळ करत मी म्हटलं,

‘वडील नाहीत तुला? सॉरी, मला माहीत नव्हतं; कधी गेले ते? ’

‘वडील गेले नाहीत; म्हणजे वारले नाहीत; पण निघून गेलेत. ’

मी स्तंभित झाले. बरेचदा आपल्या सहज लक्षात येणार नाही किंवा कल्पनाही करता येणार नाही अशी पार्श्वभूमी असलेले विद्यार्थी शाळेत भेटत असतात. विरागशी त्याबद्दल फार बोलायला नको म्हणून मी त्याला आईला घेऊन यायला सांगितलं. त्यावर तो हो-नाही काहीच न म्हणता वर्गात गेला ; आणि शाळा सुटेपर्यंत बसला देखील. त्याला निरोप दिला होता तरीही त्यादिवशी मी त्याच्या घरच्या पत्त्यावर पत्र पाठवलं. दोन दिवसांच्या गैरहजेरीनंतर विराग माझ्यापुढे येऊन उभा राहिला. न बोलता. आज मी जरा रागानं विचारायचं ठरवलंच होतं.

‘विराग, आई कुठाय्? आली का नाही? ’ तो गप्प.

‘त्यांना काळजी नाही आपल्या मुलाची? पत्र मिळालं की नाही? ’

पाठीमागे लपविलेलं माझं पत्र विराग ने पुढे केलं..

‘अरे, मग आई का आली नाही? ’

‘आईला वाचता येत नाही’.. माझ्या रागामुळे त्याने चाचरतच सांगितलं.

‘ठीक आहे ; आता मी बघतेकाय करायचं. ’

आता मी पाठपुरावा करायचाच, असं ठरवलं होतं. विरागचं घर फारसं लांब नव्हतं हे पत्त्यावरून समजलंच होतं. मग मी शिपायाकडे पत्र देऊन व तोंडी निरोप देऊन त्याला विरागच्या घरी पाठवलं. अपेक्षेप्रमाणे अर्ध्या तासातच विरागची आई माज्यासमोर उभी होती. तिला शाळेत कशाकरता बोलावलं हे मी तिला सांगितलं.

'बघा की वं; अलीकडे असंच करायला लागलाय्. घरी अभ्यास बी करत न्हाई. शाळैतून लवकरच घरी येतो; म्हणतो अर्धीच झाली शाळा.. '

'अहो, पण तुम्ही येऊन भेटला का नाहीत कधी, तो असं करतो तर! '

'आता काय सांगू तुम्हाला बाई, माझं कशातच लक्ष लागत न्हाई. या पोराकडंबी न्हाई'

' का? काय झालंय असं? '

' अवं, याचा बाप गेलाय निघून घरातनं. चांगली सरकारी नोकरी. चांगला पगार. सगळं कसं नीट होतं बघा'

' मग काय त्यांनी दुसरं लग्न केलं? '

' नाही वं ; त्यांना संन्यास घ्यायचा होता म्हणे. अता मला काय कळतंय संन्यास म्हंजे काय ते. पन घरातनं निघून जातीन असं न्हवतं वाटलं वं. आज सात वरसं झाली बघा. कुट्ठं बी पत्त्या नाही. खूप शोध घेतला. '

मी विचारलं, ' मग घरखर्च कसा चालतो? विरागने तर वर्षाची फी एकरकमी भरली आहे! '

' विरागचा मामा मला मदत करतो, मी बी कामं करते धुणंभांड्याची. कसंतरी भागतं. अता हे कळायला नको का विरागला? कोण किती दीस मदत करीन? यानं अभ्यास करायला पायजे की नगं? '

ती बाई मलाच प्रश्न करत होती. यासारखं आणखीही 'रडगाणं' गात विराग च्या आईनं माझा बराच वेळ घेतला. मी माझ्यापरीनं तिच्या मोडलेल्या संसाराबाबत थोडी सहानुभूती दाखविली; मात्र विरागकडे लक्ष देण्याविषयी निक्षून बजावलं. वरचेवर येऊन भेटत जा हे सांगायलाही मी विसरले नाही.

काही दिवस ठीक गेले. विराग नियमित हजर राहिला. सत्रपरीक्षा जवळ आली होती. कोणीही शाळा बुडवायची नाही अशी माझी सक्त ताकीद होती. नववीच्या अभ्यासाचं गांभीर्य आम्ही शिक्षक मुलांच्या मनावर सतत बिंबवत होतो. आमची शाळा शहराच्या ज्या भागात होती तिथं अशीच घरं जास्त होती की मुलांना शाळेकडूनच संस्कार मिळण्याची गरज होती. मध्यमवर्ग किंवा त्यापेक्षाही खालचा आर्थिक स्तर, अर्धशिक्षित किंवा अशिक्षित पालक असेच विद्यार्थी संख्येनं अधिक होते. आम्हा सर्व शिक्षकांनाही चांगली जाणीव होती. सुदैवाने सगळा स्टाफ मेहनती होता व अशा विद्यार्थ्यांना 'वर' आणण्यात आनंद मानणारा होता..

नियमितपणाच्या थोड्याशा सातत्यानंतर विराग ने पुन्हा 'दांडी' मारली. याची गंभीर दखल घेण्याचं मी नक्की केलंच होतं. पण दुसऱ्या दिचशी विरागला 'पाहताच' मी राग विसरून काळजीयुक्त आश्चर्यानं त्याला विचारलं,

'अरे विराग, काय झालं? .. चेहरा कसा सुजला एवढा..? डोळयांखाली काळं निळं..?

त्याला एकदम रडू फुटू लागलं. पण ते निग्रहानं आवरायचाही प्रयत्न तो करत होता. मी त्याला स्टाफ-रूम मधे आणलं. आता तो निग्रह करू शकला नाही. त्याच्या पाठीवर मी ठेवलेल्या हातानं जो मायेचा ओलावा त्याला लाभला त्यानं तो विरघळला. मी प्रेमानं, विश्वास देऊन त्याला म्हटलं,

'मला सांग विराग, काय झालं? मी तुला मदत करीन.. अगदी भिऊ नकोस. '

'मला आईनं अन् त्या माणसानं मारलं.. '

'कोणत्या माणसानं? '

‘आई म्हणते त्याला मामा म्हण. पण मिस्, तो मामा नाही माझा.. आईला भाऊच नाही कोणीही.. ’

‘बरं; नसू दे मामा. पण तो भावासारखा आहे ना आईच्या? अन् तोच तर तुम्हाला पैशाची मदत करतो ना? .. आईच सांगत होती तुझी. मग मामा म्हटलं म्हणून कुठे बिघडलं? ’ मी समजावणीच्या सुरात म्हटलं.

नाही मिस्. मी नाही म्हणणार मामा त्याला. मामा काय असं वागतो? ’

‘असं.. म्हणजे कसं? ’.. मला मनात उमजू लागलं होतं. पण विरागला काय नि कुठवर समजतंय ते मला पाहायचं होतं.

‘मिस्, तो माणूस सतत येतो घरी. अन् मी शाळेत आलो ना, म्हणजेच येतो. मला शेजारच्यांनी सांगितलंय, तो चांगला माणूस नाही म्हणून.. आणि मी पण पाहिलंय्.. मागच्या वर्षी युनिफॉर्म नव्हता म्हणून मिसनी मला घरी पाठवलं ना, तेव्हा आई अन् तो जवळ जवळ बसून.. ’त्यानं माझ्याकडे न पाहता वाक्य पुरं केलं. ‘घाणेरड्या गोष्टी करत होते, सिनेमातल्यासारख्या.. ’

मी अवाक् झाले होते. विरागची व्यथा मला नेमकी समजली होती; पण मनात विचारांचा गुंता होत चालला होता. मी विचारले,

‘पण काल काय झालं? तुला एवढं मारलंय ते.. ’

‘काल तो आला तेव्हा मी त्याच्या अंगावर धावून गेलो अन् त्याला कुलूप फेकून मारलं.. पण मोठं नव्हतं कुलूप.. ’ तो गप्प झाला.

'हे बघ मी तुझ्या आईशी बोलते किंवा आणखी काहीतरी मार्ग काढू आपण.. तुला आजी.. आजोबा.. किंवा मामा मावशी वगैरे कोणी असतील तर मी त्यांच्याशी बोलिन वाटलं तर.. पण तू असा वेड्यासारखा वागू नकोस.. '

खरं तर विरागला काय सांगावं हे मलाच समजत नव्हतं.

'मिस, माझ्या आईलाच सांगा कसं वागायचं ते. मला नाही तो माणूस घरी आलेला खपत! म्हणूनच मी शाळेत येत नाही.. '

त्या वेळेपुरती मी विरागची समजूत घातली. मनोमन मी ठरवलं की विरागची आई व तिच्या नातेवाईकांशी बोलायचं. विरागचं आयुष्य उमलत्या वयातच कोमेजू नये ही माझी कळकळ होती. पण घडलं ते वेगळंच..

दुसऱ्याच दिवशी शाळेत येतांना माझ्या स्कूटरला जबरदस्त अपघात झाला. एका मोठ्या गाडीनं स्कूटरला मागून धडक दिली व मी फेकले गेले. शुद्धीवर आल्यावर कळलं की मी हॉस्पिटलमध्ये आहे; व एक पाय बांधून ठेवलेला आहे! पूर्ण अंग ठेचाळून प्रचंड दुखत असल्याचं जाणवत होतं. आजूबाजूला माझ्या घरातील माणसांचे काळजीयुक्त चेहरे मला दिसत होते,, ,,

यानंतर ऑपरेशन. प्लास्टर.. मग घरी दोन महिने.. त्यानंतर हालचाल.. अशी हळू प्रगती होत होती. जरा बरंवाटल्यापासूनच शाळा.. सहकारी व विद्यार्थ्यांची आठवण होत होती.. सहकारी भेटायला येत अधून. मधून..

त्यांच्याकडून विरागबद्दल कळलं ते अतर्क्य वदुःखदायक होतं..

माझ्या अपघाताच्या काही दिवसांनंतर विरागनं आपल्या आईला घरातल्या मोठ्या कात्रीनं जखमी केलं होतं. या प्रकारानं घाबरून जाऊन आईनं पोलिसात तक्रार केली होती. सगळे सोपस्कार होऊन, शाळेत विरागची चौकशी होऊन ज्युव्हेनाईल कोर्टानं त्याला रिमांड होम मधे पाठविलं होतं!

माझं मन आतल्या आत रडू लागलं. वाटलं, अपघात झाला नसता तर माझ्याकडून त्याच्या समस्येत काहीना काही मार्ग मी काढू शकले असते का? .. कदाचित नसतेही.. पण मला चुटपूट लागून राहिली. मन स्वतःला क्षमा करत नव्हतं.

मला डॉक्टरांकडे फॉलो-अप साठी जायचं होतं;त्यांच्या हॉस्पिटलजवळच रिमांड होम होतं. मी परवानगीची व्यवस्था वगैरे करूनच ठरल्यावेळी तिथं पोहोचले. व्हिजिटिंग रूममध्ये विराग माझ्यासमोर येऊन उभा राहिला. त्याला पाहून मी चकितच झाले, इतका तो बदलला होता. चेहऱ्यावर एकप्रकारचा निर्ढावलेपणा, बोलतांनाचा फुटलेला आवाज, शरीरात आलेली नवी पुरुषी रग! पण माझ्याशी बोलतांना आवाजात नम्रता होती. म्हणून मला धीर आला.

‘मिस, तुमचं आता कसं आहे? ’ तोच प्रथम बोलला.

‘हे असं अजून दोन-तीन महिने तरी.. ’बाजूला ठेवलेल्या क्रचेस् दाखवून मी म्हटलं.

‘पण विराग, तू असं नको होतंस करायला.. तुला इथं पाहून मला खूप त्रास होतोय, दुःख होतंय.. ’ मी.

‘मिस, आईबाप आपल्या मुलांना शिकवतात ना कसं वागायचं ते. इथं आमच्या आईलाच कळत नव्हतं कसं वागायचं ते. कशाला आई म्हणायचं तिला? ती म्हणली ती लग्न करणार आहे त्या माणसाशी. आपल्याला नाही आवडलं ते. मी तिला म्हटलं, मला नको असला बाप. माझा बाप काही मेला नाहीए. संन्यास घेतलाय त्यानं. एखादवेळी येईलही परत. मग जुंपली आमची! ’

थोडा वेळ थांबून तो म्हणाला, ‘मिस, आई मला म्हणाली, तू मला मेलास आन् मी तुला मेले असं समज. ’

मी मधेच म्हणाले, ‘तुझं शिक्षण खुंटलं ना या सगळ्या प्रकारात.. ’

क्षणाचीही उसंत न घेता तो म्हणाला,

‘मिस, तुम्ही सांगा, मी जबाबदार आहे याला? माझ्यामुळं घडलं हे का आईमुळे? तुम्हीच सांगा. मला तर शिकायचं होतं मनापासनं. ’

आणखी थोडावेळ अशीच काही शब्दांची देवाण-घेवाण झाली नि मी उठले. विरागनंच माझ्या क्रचेस उचलून मला दिल्या.. मला मात्र मी कायमची पांगळी झाल्यासारखंवाटू लागलं होतं.. एका उमलत्या कळीचं कोमेजणं थोपवणं माझ्या हातात नव्हतं. समाजातल्या एका समस्येपुढे मी अपंग ठरले होते!

वाटलं, मुलांवर संस्कार करायचे म्हटले की सर्वांना फक्त शिक्षक आठवतात. शिक्षकांसमोर मुलं फक्त काही तास असतात. पालकांचाही मुलांना घडविण्यात खूप वाटा असतो, हे विसरून कसं चालेल? विरागच्या वयाची मुलंओल्या मातीच्या गोळयासारखी असतात. दुर्लक्ष केलं तर त्यांचं गुन्हेगारात रूपांतर व्हायला वेळ लागत नाही. गुन्हेगार, आतंकवादी निर्माण होतात, याचं दायित्व आपणा सर्वांवर आहे; समाजावर आहे. हे आपल्याला कधी उमगणार?

****

# सुमा

'सुमा, आवरलं का तुझं? चल. ' सबिनानं अंगणातूनच आवाज दिला.

'आले ग! पण तू आत ये ना ; तुझा बुरखा ठेवायचा असेल ना? ' सबिना तीन पायऱ्या चढून आत गेली. तिनं नेहमीप्रमाणे बुरखा काढून ठेवला. मग बॅकपॅक सावरत दोघी कॉलेजला निघाल्या. दोघी जीन्स आणि कुर्ता या वेषात होत्या. ते एक तालुक्याचं गाव होतं. टुमदार. छानसं. गेल्या वर्षीपासून कॉलेज नव्यानं सुरू झालं होतं. त्यामुळे मुलींची सोय झाली होती. दहावीपर्यंत शाळा आधी होतीच. कॉलेजमुळे आता मुलींच्या शिक्षणात खंड पडत नव्हता. दहावीनंतर मुलांना सहजच पुण्याला पाठवलं जायचं. पण मुलींचं शिक्षण तिथंच थांबायचं. आता नवीन निघालेल्या या कॉलेजमुळे मुलींचीही सोय झाली होती.

' सुमा, आज आपल्याला लांबच्या रस्त्यानं जावं लागणार आहे, म्हणून मी जरा लवकर आले. '

'का गं? लांबच्या का? ' सुमानं विचारलं.

'रस्त्याचं काम सुरू झालंय नं; सगळीकडे खोदून ठेवलंय. ' सबिना उत्तरली.

दोघी लगबगीनं चालत निघाल्या. कशाबशा वेळेत पोहोचल्या. कॉलेज संपून निघाल्या तेव्हा उन्हं तापली होती.

'आता जाऊ या नेहमीच्याच रस्त्याने'सुमा म्हणाली. दोघी रेंगाळत गप्पा मारत चालल्या होत्या.

‘ए, आज शिकवला तो धडा किती छान होता नं! प्रेम म्हणजे काय असतं ते आज मला कळलं. ’---सुमा म्हणत होती.

‘ पण तिनं तिच्या आई-वडिलांशी भांडावं हे मला नाही पटलं’---सबिना.

‘मग तिनं काय करायला हवं होतं? ---सुमा.

‘सुमा, तो तर तिच्या आयुष्यात आत्ता आला होता. त्याच्यासाठी तिनं, जन्म दिलेल्या आईवडिलांचा अपमान करावा हे मला आवडलं नाही. अगं पहिले आईवडील, नंतर तो! ’

‘हंऽ. तुझंही खरं आहे म्हणा! ’

असं म्हणत म्हणत खाली न पाहताच चालत असलेली सुमा एकदम पुढच्या खड्ड्यात पडली. दीड दोन फूटच असेल खड्डा. खरं म्हणजे पडता पडता ती वाचली. हातातली कुदळ टाकून देऊन तिथे खणणाऱ्या तरुणानं तिला पटकन सावरलं. त्यामुळे थोडं खरचटण्यापलीकडे तिला फार काही लागलं नाही. तो खड्ड्यातच उभा होता.. सबिनानं तिला हात दिला व ती वर आली. फार संकोचली होती सुमा. त्या तरुणाकडे बघून ‘थँक्स’ एवढंच कसंबसं म्हणाली. दोघी घराकडे निघाल्या.

दुसऱ्या दिवशी सुमा व सबिना नेहमीप्रमाणे कॉलेजला निघाल्या. सकाळी रस्त्याचं काम बंद होतं; पण कॉलेज सुटल्यावर काम चालू दिसलं. सुमा बघत होती कालचा तो तरुण दिसतो का ते. तो खणत जरा पुढे गेला होता. सुमाने सबिनाच्या हाताला धरून तिला ओढत त्याच्याजवळ नेलं. त्यानंही हसून पाहिलं. स्वतःच्या बॅकपॅकमधून एक कॅडबरी काढून सुमानं त्याच्यापुढे धरलं.

‘काल मला पडता पडता वाचंवलंस म्हणून…’सुमा धीटपणे बोलली.

‘बक्षिशी? ’ तो म्हणाला. ‘पण मी काय यवडं केलं न्हाई’

'तरीपण घे' त्यानं चॉकलेट घेतलं. पण कुठे ठेवणार? त्यानं फक्त कमरेला धोतर नेसलं होतं. तेही वर खोचलं होतं. अंगात शर्ट वगैरे काहीच नव्हतं. त्याचं काळं पिळदार शरीर घामानं निथळत होतं. हातात चॉकलेट घेऊन तो उभा राहिला. त्याची अडचण ओळखून सबिना म्हणाली,

'दे आपण तिघं खाऊन टाकू या' तिघांनी चॉकलेट खाल्लं व त्या निघाल्या.

'सुमा, तू चॉकलेट...'

'अगं, इथं कॉलेजच्या कँटीनला घेतलं. म्हटलं त्याला काहीतरी दिलं पाहिजे. मला आवडला ग तो. '

'त्याच्यात काय आहे आवडण्यासारखं? '---सबिना

त्याचा काळा कभिन्न रंगच आवडला मला. त्याचं पैलवानासारखं कमावलेलं शरीरही सिक्स-पॅक नटासारखं आहे. '

'हंऽ बाईसाहेब खूप झालं त्याचं कौतुक'

दुसऱ्याच दिवशी त्यानं दोघींना खुणेनं बोलावून जवळच्या फडक्यातून काढून चिंचेचे आकडे दिले...ते त्यांनी घेतले...

रोजच जाता येता दोन शब्द बोलणं होऊ लागलं. सुमाचं त्याच्याबद्दलचं आकर्षण वाढू लागलं होतं. सबिनाच्या ते लक्षात आलं होतं. ती सुमाला सांगत होती, 'सुमा, तुझं जे चाललंय ते बरं नाही. '

'माझं काय चाललंय, सबिना? तो मला आवडतो इतकंच'

'त्याचं नाव सुद्धा माहित नाही आपल्याला'

'त्याचं नाव गेनू; काल सांगितलं त्यानं मला. '

‘तुला? तू एकटी कधी आली होतीस? ’

‘काल त्या शिंप्याकडे आले होते, तेव्हा भेटला होता तो’ ---सुमा म्हणाली

सबिनाने ओळखलं की आता सांगून काही उपयोग नाही.

खरोखरच सुमा रोजच संध्याकाळच्या आधी काहीतरी निमित्त काढून काम चाललेल्या जागी जायची आता दोघं एकमेकांशी मनमोकळे बोलू लागले होते. काय बोलत, ते त्यांचं त्यांनाच माहीत होतं.

तिनं त्याला सांगून टाकलं, ‘तू मला खूप आवडतोस. ’ तो म्हणाला, ‘मला बी तू लई आवडलीस बग. ’

जरा रस्त्याच्या कडेला जाऊन त्यानं तिचा हात धरला व म्हणाला,

‘आपण दोघं लगीन करू या; तू तयार हैस ना? ’

‘गेनू मी तयार असून काय उपयोग? घरनं परवानगी नाही मिळणार मला. ’

‘का? मी तुमच्या जातीचा नाय म्हणून? पण आपलं प्रेम हाय ना एकमेकांवर! ’

‘प्रेम आहे रे! पण जुन्या विचारांच्या लोकांना नाही चालत’

‘मंग आपण पळून जाऊन लगीन करू’. असं बोलून त्यानं एकदम तिला मिठीत घेतलं. जवळपास कोणी नव्हतं अन् जरा सा अंधार पडला होता म्हणून बरं! सुमा त्याच्या मिठीनं भारावून गेली. तिनंही त्याला घट्ट मिठी मारली. क्षणभरानं ते वेगळे झाले. सुमा म्हणाली,

‘आपण पळून जाऊन लग्न करू या;मला चालेल. ’

आदितवारी सुटी मिळंल तेव्हा मी करतो सगळा इंतजाम’…तो म्हणाला

पुढचे काही दिवस कसे संपले ते सुमाला कळलंच नाही. रोज संध्याकाळी त्या दोघांची खलबतं होत होती.

रविवारी गेनूला तिनं विचारलं, ‘तुझ्या आई-वडलांना सांगितलंस का माझ्याबद्दल? ’

‘हांऽऽ! ते तर लई खूश हैत. पण तू आमच्या झोपडीत राहशीन नं? इचारत होते’.... गेनू आनंदात म्हणाला.

‘गेनू, मी तुझ्याबरोबर कुठेही राहीन. लग्नानंतर तू आणि मी वेगळे थोडेच राहणार? आपण एकच होऊन जाऊ. प्रेमात असा खूप त्याग करावा लागतो. ’

‘त्याग म्हंजी? ’ ‘

‘जाऊदे. नंतर सांगेन’

पुन्हा जरा आडोशाला जाऊन गेनूनं तिची पप्पी घेतली.... ती नको नको म्हणत होती पण तिला त्याचा आडदांड स्पर्श आवडत होता...

सुटीत सगळी व्यवस्था झाली. माळावरच्या म्हसोबाच्या देवळात लग्न होणार होतं. घरातून कॉलेजला निघतांनाच काही कपडे घेऊन सुमा बाहेर पडली. तिला कळत होतं पुढे वादळ होणार आहे. पण तिला गेनूशिवाय काही सुचत नव्हतं. मात्र तिनं एक चिठ्ठी लिहून ठेवली; शोधाशोध होऊ नये म्हणून. सबिनालाही तिनं विश्वासात घेतलं होत; घरी जाऊन आईशी बोलायला सांगितलं होतं. सबिना तिला म्हणाली होती, ‘सुमा, पुन्हा एकदा विचार कर.. ’ पण सुमाला जणू काही ऐकूच आलं नव्हतं.

देवळात लग्न झालं. गेनूचे आईवडील आलेले होते. सुमाच्या चेहऱ्यावर हात फिरवून त्याची आई म्हणाली, ‘माझ्या पोराचं कल्यान झालं ग पोरी. आता तुझ्या घरी जाऊन पाया पडा; जा! ’

गळ्यातल्या माळा तशाच ठेऊन टांग्यात बसून ते दोघं सुमाच्या घरी गेले. दुरून खिडकीतून पाहूनच वडिलांनी दार बंद केलं. सुमानं खूप वाजवलं, हाका मारल्या पण त्या दाराला दया आली नाही. दोघंही परत फिरले. झोपडीत आले. सुमा खूप रडली. गेनूनं तिची समजूत घातली. हा दोघांचा निर्णय होता..... आणि पुढे काय होणार याची दोघांना आधीच कल्पना होती .... सुमा त्याच्या मिठीत रडायची थांबली.

दुसऱ्या दिवशी सकाळी कोणीच कामावर गेलं नाही. पण खूप कसली तरी तयारी चालली होती. सुमा सुस्तपणे सगळं पाहात होती. तिनं गेनूला विचारलं,

‘हे सगळं काय चाललंय? ’

‘आज सांजच्याला पूजा आहे; जातीतल्या लोकांना जेवन हाए’.. पूजा आपण दोघांनी करायची असती’

सकाळपासूनच प्रातर्विधी, अंघोळ याची सुमाला अडचण भासू लागली होती; ती काहीच बोलू शकत नव्हती....

संध्याकाळी पूजेचा सोहळा आवरला, गेनू व सुमा पंगतीत जेवायला बसले. पाहुण्यांचा जल्लोष चालला होता. पत्रावळीवर काही तरी नॉनव्हेज वाढलं होतं.

सुमा गेनूला म्हणाली, ‘हे काय आहे? मी हे खात नाही. ’

‘तो परसाद आहे. तुला खाल्ला पायजे. नव्या नवरीनं त्यो खायचाच अस्तो. ’

‘छेऽऽ. मला शक्य नाही. ’ ती म्हणाली।

‘आये, ही बग, काय म्हनती. परसाद नको म्हन्ती’गेनू आपल्या आईला म्हणाला.

आई तिच्याजवळ बसली, ‘ बाईमाजी, आज तुला डुकराचं मांस खायलाच पायजे. परसाद हाय त्यो. तुमी लोक खात नाई, माहितै. पण आता तू आमची हैस कनैऽ? थांब मी भरवते तुस्नी’

असे म्हणून आईनं मासाचा एक घास बळेबळे तिच्या तोंडात कोंबला. तिचा प्रतिकार गेनूनं मोडून काढला….. जे व्हायचं होतं तेच झालं……ती बाहेर पळत गेली आणि भडाभडा ओकली…..!

आता सासू कडाडली, ‘ही असली बामणी कवतिकं चालायची न्हाईत आता. मी सांगन ते करावंच लागन…. गेनू, सांग तुज्या बायलीला…’

तोंडावर पाणी मारून ती हुंदके देत बसली. रात्री गेनूनं तिला समजवायचा प्रयत्न केला. त्याची मिठी तिला आता गोड वाटत नव्हती.. तिचं रडणं चालूच राहिलं.

पहाटे सुमा हळूच उठली. सगळे झोपेत होते. ती बाहेर आली;तिचा निश्चय झाला होता.

सकाळी गेनू जागा झाला तेव्हा सुमा तिथं नव्हती म्हणूण तो बाहेर आला आणि किंचाळलाच! ‘सुमा’ऽऽऽ आई-वडील सगळे धावले…. सुमाने झाडाला गळफास घेतला होता…..

सगळं संपलं होतं. सुमाच्या आई-वडलांनी हंबरडा फोडला… सुमा, आकर्षण न् प्रेम यातला फरक कळला नाही तुला पोरी….. त्याचीच ही नियतीनं दिलेली शिक्षा….. ’

सगळं गाव गोळा झालं.. जाती-पाती मानू नये हे खरं.. पण अशी सांस्कृतिक तफावत असल्यावर असंच व्हायचं.. लोक बोलत होते..

****

# निर्णय

दुपारचे तीन वाजले; डॉ. रोहित अजून दवाखान्यातच होते. शेवटचा पेशंट, तपासण्याच्या खोलीत आला. त्याला पाहून त्यांनी काही औषधं लिहून दिली आणि हातातले रबरी ग्लोव्हज् झटकन काढले. स्मिताचा फोन येऊन गेला होता. आता निघायलाच हवं होतं. स्मिता जेवायची थांबली होती. रोहितनाही सपाटून भूक लागली होती. पण तेवढ्यात शिवा धावत आला; त्यानं सांगितलं,

‘गावाकडचा कोंडिबा त्याच्या मुलाला घेऊन आलाय्. त्यालामी ओटीवर बसवलं आहे. आत बोलावू? ’ रोहित किंचित त्रासले; पण त्यांच्यातला डॉक्टर जागा झाला.. ते लगेच म्हणाले,

‘हंऽ बोलाव आत.. ’

कोंडिबा त्याच्या 8-10 वर्षाच्या मुलाला घेऊन आत आला. डॉक्टरांनी त्याला तपासण्याच्या टेबलवर झोपवायला सांगितलं. व गळयातला स्टेथ कानाला लावला. त्यांनी काळजीपूर्वक मुलाला पाहिलं.

‘ नाव काय बाळा तुझं? ’‘संजय’ मुलानं क्षीण आवाजात उत्तर दिलं.

‘ घाबरू नकोस हं. तू आत्ता बरा होशील. पण एक सुई टोचायला लागेल; चालेल ना?’

कोंडिबानं संजयच्या आजाराचं वर्णन केलं. आठवडाभर थंडी-ताप, खोकला, जेवण जात नव्हतं. अशक्तपणा इतका की उभं राहत नव्हता. रोहितनं कसलं तरी इंजेक्शन दिलं. कोंडिबाला दुसऱ्या दिवशी संजयला घेऊन पुन्हा बोलावलं. आता त्यांनी हात धुतले व ते घरी निघाले. ड्रायव्हरनं गाडी काढली होती..

डॉक्टर रोहित जनरल प्राक्टिशनर होते. दवाखाना खूप चालायचा. त्यांच्या हाताला गुण होता, असं सगळे म्हणत. तपासण्याच्या खोलीला लागूनच तीन खोल्या होत्या त्यात काही कॉट्स होत्या. गरजू पेशंटना तात्पुरतं ऍडमिट करून घेता येई व गरजेप्रमाणे घरी किंवा मोठ्या हॉस्पिटलमधे पाठवलं जाई. त्यांचे पेशंट हे बहुधा निम्न वर्गातले असत. फारशी ऐपत नसलेले. त्यांना परवडतील अशा दरातच त्यांना उपचार मिळत व रुग्ण बरेही होत. त्यामुळे प्रॅक्टिस चांगली होती. शहराच्या तशाच वस्तीत दवाखाना होता, त्यामुळे कमी पैशात बरं करणारा डॉक्टर तिथल्या लोकांना भावला होता.

स्मिता व रोहित जेवायला बसले. त्यांचा 5-6 वर्षांचा मुलगा गौतम शाळेत गेला होता. त्याची आणि वडिलांची भेट रात्री उशीरा होत असे; कधी तेवढीही होत नसे. रोहितने मुद्दामच लग्न केले होते, ते डॉक्टर नसलेल्या स्मिताशी. दोघे एकाच व्यवसायात येऊन घर व आपली मुले कोण सांभाळणार? असा सरळ सरळ विचार होता. संध्याकाळचा दवाखाना रात्री अकराला संपला; आणि दमून भागून रोहित घरी आले. मागोमाग शिवाचा फोन आला,

‘साहेब, कोंडिबाच्यामुलाची तब्येतजास्त आहे. ’

‘अरेच्या, तो पुन्हा संध्याकाळी आला होता, ताप वाढला म्हणून. तर मी त्याला चांगलं औषध दिलं होतं. मुलगा कुठंय? ’

‘आत्ता कोंडिबाचा फोन आला होता, थोड्यावेळानं तो पुन्हा फोन करतोय. काय सांगू त्याला? ’……शिवा.

‘उद्या सकाळी 8 वाजता यायला सांग त्याला, मुलाला घेऊन. ’ इतकं सांगून रोहितनी फोन ठेवून दिला. सकाळी लौकरच रोहित दवाखान्यात पोहोचले. कोंडिबा आलेला नव्हता. त्याचा नातेवाईक भेटायला आला होता.

‘ डाक्टरसाहेब, कोंडिबाचा मुलागा संजय काल रातच्यालाच गेला. कोंडिबा बॉडी घिऊनश्यान गावाकडं गेलाय. तिकडंच उरकायचं म्हणून. माझीबायको, आन् कोंडिबाचा भाऊ गेलाय संगती. ’

रोहितना धक्का बसला. दुपारी संजयचा ताप न उतरल्यानं त्याला पुन्हा संध्याकाळी कोंडिबा दवाखान्यात घेऊन आला होता. त्याला रोहितनी नवीन एसीएक्स औषध दिलं होतं. त्याची तर रिऍक्शन नाही? मनातला विचार रोहितनं मनातच दाबून टाकला. ते मनात अस्वस्थ झाले. दोन महिन्यापूर्वी याच औषधाच्या परिणामामुळे दोन वर्षाचं एक बालक मृत्यू पावलं होतं. पण त्यावेळी याच औषधाने, असं कन्फर्म करता आलं नव्हतं. पण आता शंका बळावतेय्; नव्हे खात्रीच वाटतेय्.

रात्री घरी आल्यानंतर त्यांनी परदेशात फोन लावला. स्मिता ऐकत होती. पण तिला नीटसं कळत नव्हतं. सकाळी रोहितनी तिला सांगितलं ‘ मला तातडीनं दिल्लीला जायचं आहे; काम आहे. कदाचित तीन चार दिवस लागतील. ’

दिल्लीला डॉ. शर्मांकडे पोहोचल्यावर रोहितनी आपले अनुभव सांगितले. संजयचा मृत्यू व आधीच्या बालकाचा मृत्यू. डॉ. शर्मा म्हणाले

‘मी अमेरिकन कंपनीशी बोललो आहे. त्यांनीही आधीच ताबडतोब हे औषध मार्केटमधून विड्रॉ केलं आहे. ’

रोहितनं विचारलं, ‘मग आपल्याला वेळीच का कळवलं नाही? ’

‘त्याबद्दल त्यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे’---डॉ. शर्मा उत्तरले.

‘एकतर त्यांच्या नवीन औषधांच्या चाचण्या करण्यासाठी ते आमच्यासारख्या छोट्या दवाखान्यांचा वापर करतात; या देशातल्या गरिबीमुळे व अडाणी पेशंटमुळे त्यांना इथे गिनीपिग

मिळतात, पण त्या पेशंटच्या जिवाला काहीच किंमत नाही का? ' डॉ. रोहितनी कळवळून विचारलं.

'डॉ. रोहित तुम्ही स्वतःच त्या कराराला संमतीदर्शक सही दिली होती ना? त्या बदल्यात तुम्हाला भरपूर डॉलर मिळालेत, तेव्हा नाही तुम्हाला सुचलं हे? ---डॉ. शर्मांनी विचारलं. 'या परदेशी औषधनिर्मिती कंपन्या, हे उघड उघड तरीही गुप्तपणे करार करतात. भारतासारख्या गरीब देशात त्यांना हे प्रयोग सहज करता येतात. तुमच्या माझ्यासारखे डॉक्टर त्यांना बळी पडतात. '

डॉ. रोहित गप्प झाले. आपली चूक लक्षात आली होती. पण उशीर झाला होता. शर्मांनी सांगितलं, तुमचा फोन झाल्यावर मी कंपनी-चालकांशी बोललो. त्यांनी तुम्हाला दिल्लीत थांबायला सांगितलंय. त्यांचा प्रतिनिधी तुम्हाला भेटायला उद्या येतोय्'.

डॉ रोहितकडे पर्याय नव्हता. डॉलरच्या आकर्षणापायी पेशंटचे जीव पणाला लागत होते..... डॉ. शर्मांनी राहण्याची सोय केलीच होती॰

रात्री डॉ. रोहितनी स्मिताला फोन लावला. परतायला बहुधा उशीर होईल हे सांगायला. तर स्मिता म्हणाली, 'लौकर आलास तर बरं होईल. तू गेल्यानंतर बंटीला खूप ताप भरला आहे; थंडीही वाजून येतीय. त्याला नेहमीचं तापाचं औषध मी दिलं. पण काय करावं सुचत नाहीए. '

'अरेच्या! असाकसा अचानक ताप भरला? पण थांब पॅरेसिटेमॉल दिलं आहेस ना? दुसरं काही देऊ नको. '

दुसऱ्या दिवशी सायंकाळी परदेशी कंपनीचा प्रतिनिधी पोहोचला. डॉ. शर्मा, डॉ. रोहित दोघे त्याला भेटायला हॉटेलवर गेले. डॉ. रोहितनी दोन्ही केसेस डिस्कस केल्या. हा एसीएक्सचाच परिणाम असल्याचा दावा केला.

प्रतिनिधी म्हणाला, ‘ डॉ. रोहित, औषध बाजारात आणण्यापूर्वी चाचण्या करणं हे पूर्णपणे साएंटिफिक आहे. त्याचा परिणाम पाहिल्याशिवाय तर ते बाजारात आणू शकत नाही ना? हा आपल्या प्रोफेशनचाच एक भाग आहे. आज तुम्ही नाही, तर दुसरे कोणी डॉक्टर्स तयार होऊ शकतात. आम्ही छोटे दवाखाने, जनरल प्रॅक्टिशनर निवडतो, याचं कारणच हे आहे की परिणामांचा( साईड इफेक्टस) जास्त गवगवा होऊ नये. मानवजातीच्या कल्याणासाठीच तर औषधांची निर्मिती होत असते. आमच्याकडे आधी गिनीपिग्ज वर टेस्ट करून मगच आम्ही हयूमन पेशंटस वर ट्राय करण्याकरता तुमच्या सारख्यांना हाताशी धरतो. यात आमचं काय चुकलं? आत्ताच्या सारखे कधीकधी निगेटिव्ह रिझल्टस येतात.. हा प्रयोगाचाच एक भाग आहे. त्याकडे इतकं इमोशनल होऊन पाहायचं नसतं. उलट तुम्ही समाजकार्याच्या आमच्या साखळीची एक कडी आहात, याचा तुम्हाला अभिमान असला पाहिजे. ’

प्रतिनिधीने आपलं लेक्चर थांबवलं. डॉ. शर्मा व डॉ. रोहित परत आले. रोहितनी स्मिताला फोन लावला.

‘बंटी कसा आहे, स्मिता? ’

‘अरे, ताप नाहीए आता त्याला. शिवानं मला एक बाटली आणून दिली होती की, ताप उतरला नाही तर हे द्या. साहेब हेच देतात, लहान मुलांना. पण ते काही लागलं नाही. ’

तिचं वाक्य संपेपर्यंत रोखून धरलेला श्वास रोहितनी सोडला.

परतीच्या फ्लाईटमधे डॉ. रोहित विचार करत होते; आता कंपनीला काय कळवावं! पोहोचल्यावर ई-मेल करायची होती. रोहित विचार करत होते..

या एका औषधाचा परिणाम असा आला, म्हणून प्रत्येकवेळीच असा साईड इफेक्ट मिळेल असं थोडंच आहे? शिवाय मी ‘नाही’ तर दुसरा कोणीतरी उभाच असेल हे करायला. मग, व्हाय नॉट मी? शिवाय लोनचं ओझं डोक्यावर आहे, ते पैशांशिवाय उतरणार कसं? शिक्षण आणि

दवाखान्याची एस्टॅब्लिशमेंट, यातच केवढी रक्कम गुंतली आहे. साध्या प्रॅक्टिसवर कसं हे चालणार? पीजी करायला पैसा नव्हता म्हणून तर जीपी (जनरल प्रॅक्टिस) करणं भाग पडलं! हे सगळं व्हिशस सर्कल आहे. शिवाय उद्या बंटीचं शिक्षण.. प्रतिनिधी म्हणाले ते काही खोटं नाही,

औषधांच्या टेस्ट तर व्हायलाच हव्यात..

डॉ. रोहित घरी पोहोचले तेव्हा गौतम धावतच त्यांच्याकडे आला. 'बंटी, ताप नाही ना आता? '

'नाही पप्पा; मला ममानं प्रॉमिस केलंय की पप्पा आल्यावर गाडीतून मोट्ठ्या राइडिंगला जाऊ. चला नं जाऊ या.. '

'अरे हो; मला एक काम आहे तेवढं झालं की जाऊ या. ' फ्रेश झाल्यावर रोहितनी लॅपटॉप उघडला, आणि मेल टाईप केली..

' मला तुमचं म्हणणं पटलं आहे. दुसऱ्या औषधाचा पुढचा लॉट कधी पाठवताय? मी वाट पाहतोय्.. डॉ. रोहित. '

स्मिता ने सहज विचारलं, 'काय आहे एवढं अर्जंट? '

तिला काहीच सांगायची सोय नव्हती. तिला प्रेमानं जवळ ओढल्यासारखं करून रोहित म्हणाले,

' जा तयार हो लौकर; बंटीला प्रॉमिस केलंयस ना? चल, जाऊ या लॉंग ड्राइव्हला..'

मनात विचार रेंगाळत होता देशातल्या गरिबीमुळे अन् अफाट लोकसंख्येमुळे आपल्या देशाचं असंही शोषण होतंय ; एकापरीनं मी हातभार तर लावत नाही ना या शोषणाला?

****

# प्रवाह

रात्रीचे साडेआठ वाजून गेले तरी विभाचा पत्ता नव्हता. मालतीबाईंची अस्वस्थता नकळत वाढू लागली होती. काल संध्याकाळपर्यंतच विभा यायला हवी होती; ती आजही अजून आली नव्हती, म्हणजे काळजी वाटणारच ना!

अहमदनगर म्हणजे काही लांबचा पल्ला नव्हे. पुण्याहून एसटीने अवघा चार तासांचा प्रवास. रोज शेकडो गाड्या सुखरूप येतात अन् जातात. त्यामुळे काळजी करणं कितपत योग्य होतं? आणि काळजी तरी कोणाची? विभाची? विभा! वय वर्षे अठ्ठावन्न! मालतीबाईंची रूम-पार्टनर. मालतीबाईंना स्वतंत्र खोलीच मिळाली होती. पण त्यांनीच एकटीपेक्षा आणखी एक व्यक्ती असावी हे पसंत केलं होतं. वृद्धाश्रमात दहा बाय दहा च्या खोलीत राहणारी विभा! म्हणजे मालतीबाईंनी काळजी करावी असं का वय होतं तिचं? येण्याची सांगितलेली वेळ टळून गेल्यापासून मालतीबाई हळूहळू बेचैन व्हायला लागल्या. नकळत तिची अधिकाधिक वाट पाहू लागल्या होत्या. गुरुवारची रात्रीची खिचडी खाण्यासाठी त्या कितीतरी वेळ थांबल्या. पण शेवटी घासभर खाऊन खोलीत आल्या. त्यांना वाटलं होतं , आपण येईतो ती आलेली दिसेल. पण कसचं काय!

वाट पाहण्याचे क्षण जसजसे पुढे सरकतात, तसतसा राग कणाकणांनं वाढू लागतो. मालतीबाई मग स्वतःवरच रागावल्या. मनातल्या मनात. का म्हणून मी तिची एवढी वाट पाहतेय्? सहा महिन्यांपूर्वी ही विभा कोण हे ठाऊकही नव्हतं; आणि आज तिच्यासाठी घासही अडकू लागला आहे! आयुष्याच्या सत्तर वर्षांनंतर इतकं गुंतायचं? अजितच्या अभिषेकमध्ये मन गुंतून गेलं , त्याचा केवढा तरी त्रास झाला. तरीही आपल्या मनाला नाती जोडण्याची वाईट खोड

अजूनही चिकटून राह्यलीय? इथं वृद्धाश्रमात कसं संन्यस्त वृत्तीनं राहिलं पाहिजे. तेवढ्याचसाठी ना आपल्या संसारापासून घरापासून दूर आलो आपण? मग का म्हणून जीव लावतो आपण विभाला? आणि तिनं तरी का माझा विचार करावा? मला सांगितलं म्हणून त्याच वेळी परत यायला ती काही बांधील नाही. माझी अशी पर्वा तिच्यासारख्या एका परक्या व्यक्तीने का करावी? जिथे माझ्या पोटच्या पोरानं मला तुटक वागणूक दिली, तिथं ही परकी विभा मला काय आपुलकी दाखवणार?

मालतीबाईंनी कपाट उघडून त्यांच्या रात्रीच्या गोळया घेतल्या ; आणि दार बंद करून झोपण्याची तयारी केली. आधी रागानं उचल खाल्ली होती, त्यामुळे एक बरं झालं की वाट पाहण्याचा ताण कमी झाला.

पडल्या पडल्या मालतीबाई विचार करू लागल्या. त्यांच्यात आणि विभामध्ये केवढं तरी अंतर होतं. वयाचं होतं तसं परिस्थितीचंही. खरं म्हणजे काहीच साम्य नव्हतं. विभा एक अविवाहित स्त्री होती. जन्मभर स्वतःच्या पायावर उभी. स्वेच्छेनं एकटी राहिलेली. आता आयुष्याच्या उताराला लगल्यावर वृद्धाश्रमात येऊन राहिलेली. तिची जागा तिनं आधीच राखून ठेवली होती. एकटीनं उभं आयुष्य पेलल्यामुळे तिच्यात एकप्रकारचा आत्मविश्वास होता; धडाडी होती. स्वतःच्या आत्मिक बळाची जाणीव होती. त्याचबरोबर तिला आवश्यक असणारा एक अलिप्तपणाही तिच्यात होता.

मालतीबाईंचं आयुष्य म्हटलं तर सरळ होतं. चाकोरीतून गेल्यासारखं. थोडं फार शिक्षण झालं होतं, पण ते अर्थार्जन करून स्वातंत्र्य मिळविण्याइतकं पुरेसं नव्हतं . रीतीप्रमाणे योग्य वेळी लग्न झालं. माधवराव व त्यांच्या वयात बरंच अंतर होतं. बारा वर्षांचं. दोघांमध्ये भावनिक जवळीक काही फारशी होऊ शकली नाही. मुळात तापट असलेल्या स्वभावाला बायकोच्या सौंदर्यामुळे थोडी संशयित वृत्तीचीही जोड मिळाली होती. त्यामुळे मालतीबाईंचं आयुष्य तापल्या तव्यावर पडलेल्या पाण्याच्या थेंबाप्रमाणे चर-चर चटके सोसण्यातच गेलं होतं.

पैशाची सुबत्ता नसली तरी कमतरताही नव्हती, एवढंच त्यातल्या त्यात बरं. अजितच्या जन्मानंतर माधवराव थोडे निवळतीलसं त्यांना वाटलं होतं. पण दुर्दैवानं त्यांच्या स्वभावात काहीच फरक पडला नाही. आपल्याला घराची सावली मिळूनसुद्धा आपला जन्म उन्हातच जाणार, याची खूणगाठ मालतीबाईंनी मनाशी बांधली होती.

कुणीतरी दार वाजवलं अन् विचारांची साखळी तुटली.

‘विभा आलीस? मला वाटलं आजही येत नाहीस.’ त्यांनी आपली अतिउत्सुकता लपविण्याचा प्रयत्न केला. कोण जाणे आपण एवढा जीव लावलेला तिला आवडेल न आवडेल! तेव्हा, मालतीबाईंना आपण एवढ्या उत्कंठेनं व नंतर काळजीने वाट पाहात होतो हे लपवावंसं वाटलं.

‘खरं म्हणजे आजही नव्हतेच येणार! पण उद्या इथं एके ठिकाणी भेटायला जायचंय ना. एक छोटीशी नोकरी मिळणार आहे. त्या संदर्भात. अन् शिवाय तुम्हाला कालच येते म्हटलं होतं. तेव्हा म्हटलं वाट पाहात असाल. भाऊ-वहिनी म्हणत होते राहा आणखी म्हणून....’

‘जेवणाचं काय? तुझ्यासाठी खिचडी आणून ठेवलीय डब्यात. हवी तर खा.’

‘नको, नको; मी खाल्लंय वाटेतच. वहिनीनं भोपळघारगे दिले होते बरोबर. तुम्ही झोपा आता. मी उगीच झोपमोड केली तुमची.’

‘तसं काही नाही; मी नुकतीच पडले होते.’

पाणी पिऊन दिवा घालवून विभा आपल्या कॉटवर पडली आणि लगेच झोपूनही गेली. तिच्या श्वासाची संथ लय ऐकतांना मालतीबाईंनाही अलगद झोपेनं घेरलं. विभा आल्यामुळे आता त्यांचं चित्त स्थिरावलं होतं.

दुसऱ्या दिवशी विभा सकाळीच कामाला म्हणून बाहेर पडली. मालतीबाई पुन्हा एकट्या राहिल्या. त्यांना विभाशी काहीतरी बोलायचं होतं; त्याला अजून सवडच मिळाली नव्हती. तिच्याशी बोलावं का जिवाभावाचं? ती आपल्यापेक्षा कितीतरी लहान; शिवाय संसाराच्या बाबतीत अननुभवी. नकोच बोलायला; असंही मधूनच वाटायचं. पण विभाचा स्वभाव लाघवी आहे, ती तशी झिडकारून टाकणार नाही, असंही वाटायचं. या सहा महिन्यांच्या अवधीतच आपल्याला किती जवळीक वाटतेय तिच्याबद्दल; मग काय हरकत आहे मनातलं बोलायला? पण विषय तरी कसा काढणार?

मग त्यांना एक उपाय सुचला. पोस्टाने आलेली अभिषेकच्या लग्नाची पत्रिका त्यांनी टेबलावर सहज दिसेल अशी ठेवली. त्यांना वाटलं आता विषय निघणं अगदी अपरिहार्यच आहे.

मालतीबाई जेवायला हॉलमध्ये गेल्या. विभा बाहेरून आली ती थेट हॉलमध्येच आली.

‘ताई, बरं झालं इथेच भेटलात ते. आनंदाची बातमी म्हणजे मला पार्टटाईम नोकरी मिळाली. पगारही काही अगदीच वाईट नाही. म्हटलं, तेवढंच जरा बिझी राहिलं की बरं…’

‘अगदी मनासारखं झालं नं तुझ्या?’

‘हो ना; घरात बसायची सवयच नाही! म्हटलं रिटायर झाल्यावर काय करायचं? पण आता तो प्रश्न मिटला.’

‘पण मी म्हणते, करायचंय काय एवढे कष्ट करून? पैसे मिळवून नि इस्टेट करून द्यायला कोणी आहे का तुझं असं?’ मालतीबाई हे वाक्य बोलून गेल्या खऱ्या; पण नंतर त्यांना वाटलं, उगीच बोललो आपण तसं!

‘ खरंय तुम्ही म्हणता ते’ इतकंच बोलून विभा गप्प झाली. जेवण संपवून खोलीत येईपर्यंत कोणीच काही बोललं नाही. आल्या आल्या विभा कॉटवर आडवी झाली. मालतीबाईंनी जेवणानंतरच्या गोळ्या घेतल्या. त्याही समोरच्या कॉटवर बसल्या.

‘विभा, रागावलीस? तुला दुखविण्याचा हेतू नव्हता हो माझा! मी आपलं तुझ्या कष्टांसाठी बोलले.’

‘नाही; मुळीच रागावले नाही, ताई! उलट तुम्ही माझ्या मनातलाच प्रश्न विचारलात. मलाही हल्ली असं वाटतं, की आपलं असं कोण आहे मला? आत्तापर्यंत अशी पोकळी जाणवत नव्हती फारशी. पण अलीकडे….’

‘ लग्न न केल्याचा पश्चात्ताप होतो तुला?’ मालतीबाईंना तिचा सूर त्यांच्या बुद्धीप्रमाणे तसा वाटला .

‘नाही ; पश्चात्ताप नाही होत, पण माणसांशी नाती जोडणं, जवळीक निर्माण करणं ही प्रत्येक मानवी मनाची भूक असते, नं ताई; आणि हीच नैसर्गिक भूक मला आज प्रकर्षानं जाणवते आहे. नोकरीत असतांना आयुष्य चक्रासारखं फिरत राहिलं ; त्या चक्राचा एक खिळा बनून मीही गरगरत राहिले. नोकरीतले सहकारी हेच समसुखी, समदुःखी मित्र बनून गेले. आज त्या चक्रातून बाहेर पडल्यावर कळतंय, की ती मित्रत्वाची नातीही तेवढ्यापुरती मर्यादित होती. रोज भेटणाऱ्या मैत्रिणी इतक्या जवळच्या झाल्या होत्या की वाटायचं यांना भेटल्याशिवाय कसं राहणार आपण? त्याही म्हणायच्या,

‘तू रिटायर झालीस म्हणून काय झालं. आम्ही येत जाऊ तुला भेटायला. अन् तूही यायचंस….’

‘हंऽऽ! सुरवातीला रविवारी त्या तिघी यायच्या त्याच ना? आताशा आलेल्या पाहिल्या नाहीत खरं..’

'तेच म्हणते मी. मात्र त्यांचा काहीच दोष नाही. नोकरीत असतांना कसं, आमची सुखदुःख, आमचे प्रॉब्लेम्स एक होते; आमचे इंटरेस्टस् एक होते, त्यामुळे निर्माण झालेलं ते नातं होतं, ती काही खरी मैत्री नसते असं आता वाटतं. माझी दुसरी एक मैत्रीण म्हणते, नोकरीत एकत्र आलेले आपण एकमेकांवर लादले गेलेलो असतो. गत्यंतर नसतं म्हणून आपण मैत्री करतो, झालं! तेव्हा मला तिचं म्हणणं जास्तच तुटकपणाचं वाटलं होतं. पण आता वाटतं खरं होतं तिचं.'

विभा थोडीशी भावुक, थोडीशी हळवी झाली असं मालतीबाईंना वाटलं. तिचं मन थोडं निवळावं या हेतूने त्या म्हणाल्या, ' अगं, तुला नोकरीतल्या मैत्रिणींबद्दल वाटतं, पण इथं रक्ताच्या नात्याचा काय अनुभव आहे , तो तुला काय सांगू? तू तरी तुझं स्वातंत्र्य टिकवायचं म्हणून इथं येऊन राहिलीस . स्वतःहून! इथं, मला माझा मुलगा आहे, सून आहे, सुरेखसा नातूही आहे, माझ्या नवऱ्याच्या कमाईचं घर आहे; तरीही मी इथे येऊन पडल्येय बेवारशासारखी. कुण्णी कुणाचं नसतं बघ, या जगात.'

मालतीबाईंचा स्वर कातर झाला. विभा कॉटवर उठून बसली. तिला काय बोलावं हे कळेचना. पण मालतीबाईंनी त्याआधीच स्वतःला सावरलं होतं.

'जाऊ दे. आता काही वाटत नाही म्हणा त्याचं. जिथं नवरा आपला झाला नाही, तिथं पोरानं तरी का जिव्हाळा दाखवावा. त्यातून अजित अगदी बापासारखा निघाला. वागणं , बोलणं, स्वभाव..! काऽही फरक नाही. म्हणून तरी माझ्याबाबतीला संशयी स्वभाव बदलला असावा त्यांचा. त्यामुळेच तर त्यांनी ही शेवटची गोष्ट चांगली केली माझ्यासाठी! ह्या वृद्धाश्रमाला देणगी देऊन मला एक खोली कायमची करून ठेवली. मला म्हणाले , ' माझ्यामागे पटणार नाही तुमचं अन् अजितचं. माझ्यानंतर तुमचं घर ते…'

'पण ताई तुमच्या सुनेलाही काही वाटू नये तुम्हाला आश्रमात असं ठेवायला? बायकाच बायकांची मनं जाणू शकत नाहीत; पुरुषांनाच काय नावं ठेवायची? स्त्री-मुक्तीचा एक

अर्थ असाही होतो, स्त्रीची स्त्रीच्या जाचापासून मुक्ती, असाही होतो, हे लक्षात घ्यायला हवंय आता आपण....'

'तेच म्हणते मी, विभा. तुला लग्न न केल्याचा पश्चात्ताप होत असेल पण काही नको व्हायला. अगदी रक्ताची नाती असली तरी माणूस इथूनतिथून एकटा असतो, बघ.'

' हे तुमचं म्हणणं खरंच आहे; पण तरीही नाती जोडण्याची माणसाची नैसर्गिक भूक शिल्लक राहतेच. आता तुमचंच पाहा; तुमच्या नातवावर तुम्ही माया केलीत, अगदी जिवापाड केलीत; आधीचे कटू अनुभव असूनसुद्धा. तो मायेचा ओघ तुम्हाला बळजबरीने थांबवावा लागला, तर आता इथंही तुम्ही नवी नाती जोडत आहात. माझ्याशी इतकं आपुलकीनं, इतकं प्रेमानं का वागता तुम्ही? उद्या मीही तुम्हाला दुःखंच दिलं तर?'

बरं; नाही हो जीव लावणार तुला.' असं म्हणून मालतीबाई हसल्या. टेबलावरची पत्रिका विभासमोर धरून म्हणाल्या, 'हे बघ अभिषेकचं लग्न आहे पुढल्या रविवारी.'

'अरेच्या? एवढा मोठा झाला तो? आणि हे काय नातवाच्या लग्नाची पत्रिका आजीला पोस्टानं आली? गावातल्या गावात?'

मालतीबाई गप्प बसल्या. त्यांनी प्रयत्नपूर्वक मनातले कढ दाबून टाकले.

'मोठा कसला ग? आता कुठे चोविसावं चालू आहे त्याला. हल्ली चोवीस हे काय मुलाचं लग्नाचं वय असतं? पण ठरवलं होतं म्हणे त्या दोघांनी. दोघं एकाच ठिकाणी नोकरीही करतात. ती ही त्याच्याबरोबरचीच आहे; मग करून टाकावं, हे चांगलं नाही का?'

'पण अभिषेकने तरी स्वतः यायचं होतं तुम्हाला भेटायला! '

'बापाला घाबरला असेल, दुसरं काय?'

'ताई, लग्न करायला निघालेला मुलगा बापाला घाबरतो, हे नाही हं पटत. ही आजकालची मुलं सोय पाहून आईबापांच्या मागे लपतात ना, त्याचा मला अगदी राग येतो. स्वतःचं लग्न ठरवतांना नाही वाटतं वाटली, वडिलांची भीती?'

'जाऊ दे, विभा; असे प्रश्न स्वतःला विचारणं म्हणजे स्वतः दुःख ओढवून घेणं! झटकून टाकायचे असे विचार...'

'बरं ; पण जाणार आहात ना लग्नाला?'

'तेच; तुझा सल्ला विचारणार होते. काय करावं?..... तुला काय वाटतं?...'

' हा तर तुमच्या मनाचा प्रश्न आहे, ताई. मी सांगणं किती अवघड आहे..! '

'तरीही तू सांगावंस असं मला वाटतं. तू एवढी स्वयंभू आहेस; नक्की काहीतरी योग्य सांगशील.'

विभा संकोचली. 'बरं तर; विचार करून सांगते.' इतकं बोलून विभा पुन्हा कॉटवर आडवी झाली. जरा झोपण्याच्या इराद्यानं. तोच आश्रमात काम करणाऱ्या विमलनं येऊन सांगितलं,

'म्याडम, तुमचा फोन आलाय हपिसात. या लवकर.'

विभाच्या पिकलेल्या केसांचा 'बॉयकट' होता. तिची एकूण आधुनिक राहणी, स्लीवलेस पोलकी, हा केसांचा कट यामुळे तिला सगळे'मॅडम'च म्हणत असत. 'आलेच' असं मालतीबाईंना सांगून विभा गेली. तेव्हा मालतीबाईंना वाटलं, किती एकट्या आहोत आपण; गेल्या पंधरा वर्षात कोणाचाही फोन आला नाही आपल्याला. केव्हातरी सात-आठ महिन्यांनी एकदा अजित येतो; जसा काही हा आश्रम गावात नसून दूर कुठेतरी आहे....आयुष्यभर कष्ट केलेलं

हे शरीर धडधाकट आहे, त्याला कसलाही रोग नाही, म्हणून बरं आहे. नाहीतर कुत्र्यानंही हाल खाल्ले नसते. असं म्हणून त्यांनी मनातल्या मनात देवाचे आभार मानले.

'कुणाचा ग फोन?' विभा आल्यावर त्यांनी विचारलं.

'माझी मावसबहीण आहे ना इथंच गावात; तिच्या मुलीचं डोहाळेजेवण आहे परवा. तिचा होता फोन. आश्रमात येऊन आमंत्रण करायला हवं की फोनवर चालेल? असं म्हणाली. मी म्हटलं, 'काय करायचं इतक्या लांब येऊन? फोनवरून आमंत्रण ह्यात काही तरी कमी अगत्य, असं आपण का समजायचं? खरंच आपल्या समाजात बारीकसारीक कितीतरी सुधारणा होणं गरजेचं आहे! '

विभा जणू स्वतःशीच बोलत होती. मालतीबाईंनी एकदम विचारलं,

'विभा, एक विचारू? तुला नाही का ग कधी आई व्हावंसं वाटलं? निदान त्यासाठी लग्न करावं, असं वाटलं नाही कधीच....?'

'ताई, तुम्ही माझ्याहून मोठ्या; पण आपण आजवर मैत्रिणींसारख्या मोकळेपणानं बोलत आलो, म्हणून सांगते; लग्न करावंसं मला कधीच वाटलं नाही,पण आपल्याला मूल असावं असं मात्र खूपदा वाटलं. पण त्यासाठी लग्नाचं जोखड पत्करावं हे मला मान्य नव्हतं.'

'लग्नाबद्दल एवढ्या कडवटपणानं का बोलतेस? ते इतकं वाईट असतं तर साऱ्या जगानं ते स्वीकारलं असतं का?' ...मालतीबाई.

'जगाचं मला माहीत नाही; पण ताई, आपल्याकडली किती लग्नं खऱ्या अर्थानं सुखी असतात हो? लग्न म्हणजे दोन मनांचं, दोन आत्म्यांचं मीलन, अशी खरी पवित्र कल्पना. पण बहुतांश लग्नांमधे उरतो, तो शारीरिक व्यवहार. कारण आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृतीत लग्न म्हणजे स्त्रीनं पुरुषाचं वर्चस्व मान्य करण्याचा एक करार, एवढाच अर्थ उरलाय असं मला वाटतं. मग काय करायचं असलं बंधन स्वीकारून?'

पण मग त्याशिवाय करणार तरी काय? मी तुझ्यासारखी शिकलेली नाही म्हणून मला बोलता येणार नाही. पण लग्नाची गरज ज्या गोष्टीसाठी असते, त्या गोष्टी, लग्नसंस्था मोडली तर गैरमार्गांनी होतील अन् अधोगतीला जातील माणसं...'

विभा म्हणाली, ' ताई, तुमचंही खरं आहे. पण लग्नसंस्था टिकवायची ही गरज स्त्री आणि पुरुष या दोघांचीही आहे ना? मग ही संस्था खऱ्या अर्थानं स्त्री-पुरुष समानतेच्या पायावर उभारली पाहिजे. त्यासाठी समाजातल्या पुरुषांची मानसिकता बदलली पाहिजे. त्यांचं प्रबोधन करायला पाहिजे. समंजस पुरुष किती आहेत या समाजात, की अशा प्रबोधनाला तयार होतील? निदान मला तरी असा समंजस पुरुष भेटला नाही ; म्हणूनच केलं नाही मी लग्न.'

'आता, मी तरी लग्न करून कुठे सुखी झाले म्हणा! तू म्हणतेस तसं पुरुषी वर्चस्व सहन करीतच जगले. पण आमच्या सूनबाई पहा! तिनं चांगलं ताब्यात ठेवलंय आपल्या नवऱ्याला.'

'ताई, पुरुषी वर्चस्व नको म्हणतांना, स्त्रीने ते गाजवावं असं नाही हं मला वाटत. वर्चस्व न आणता संसार होऊच शकणार नाहीत का, ताई? स्त्री आनि पुरुष ही संसार-रथाची दोन चाकं, हे गुळगुळीत झालेलं वाक्य, असं कोणी म्हणेल. पण मला वाटतं या वाक्याचा अर्थ अजूनही आपल्याला समजलेला नाही.'

मालतीबाई फक्त ऐकत होत्या. त्यांना वाटलं, अशा तऱ्हेचे विचार आपल्या मनात आले नव्हते असं नाही; पण सुसंगतपणे आपण कधी ते मांडण्याचा प्रयत्नही केला नसता. आपण घाबरट होतो; भित्र्या होतो.

त्यांच्या विचारमग्न चेहऱ्याकडे पाहात विभा पुढे म्हणाली,

'....आणि ताई, अशा समाजात मी, लग्न नको पण मूल हवं, असं कसं ठरवू शकणार होते? मी कुठल्याही वाईट अर्थानं हे म्हणत नाहीए, ताई. पण मूल दत्तक घ्यायचं म्हटलं असतं

तरी समाजानं माझ्यावर डोळे वटारले असते. शिवाय दत्तक मुलाला नाव कुणाचं द्यावं हा प्रश्न आलाच असता.'

'बरोबर आहे तुझं. ...आणि मोठा झाल्यावर त्या मुलाला त्रासच झाला असता. मालतीबाई म्हणाल्या.

' मात्र मी माझी हौस माझ्या मोलकरणीच्या मुलीवर प्रेम करून फेडून घेतली. सुनंदा तिचं नाव. ती हुषार होती. घरची परिस्थिती वाईट....म्हणजे बाप दारुड्या अन् आई अशिक्षित. मी सुनंदाची पालक झाले. तिला शाळेत घातलं तिचं शिक्षण केलं ; मग तिच्या आईच्या इच्छेनुसार पण एका चांगल्या मुलाशी लग्न लावून दिलं. तिच्याबाबतीत त्याशिवाय पर्याय नव्हता. सुदैवानं तिचा नवरा चांगला निघाला. ती सुखात आहे आता.'

'अरे वा! छान केलंस तू. तुला खूप समाधान वाटत असेल.'

'समाधान आहे; पण सुनंदाचं पुढे काय होणार, ही एक अनाकलनीय बाब आहेच. कारण मी एकटी किंवा कुणीही एकटं-दुकटं समाजपरिवर्तन घडवून आणू शकत नाही.'

'पण मग तुझं स्वतःचं मूल, असं जे म्हणालीस, त्याबद्दल काय वाटतं आता?'

' ते मात्र राहून गेलं, याची खंत वाटते आणि हे प्रामाणिकपणे सांगण्यात मला अजिबात कमीपणा वाटत नाही.' विभा उत्तरली.

मालतीबाई आपल्या वयाच्या मोठेपणाचा आधार घेत पुढे म्हणाल्या,

'नुसतं मूलच नाही, पण वैवाहिक आयुष्यातला लैंगिक आनंद....त्या आनंदालाही तू मुकलीस, विभा. तू मघाशी म्हणालीस, तशी हीदेखील माणसाची नैसर्गिक भूक आहेच की. लग्न यशस्वी असो किंवा नसो, हा आनंद तरीही उरतोच! मीच एक उदाहरण आहे, या विधानाला.'

'ताई, तुम्ही एवढं मोकळं आणि स्पष्टपणे बोलू शकता? कौतुक आहे तुमचं. तुम्ही म्हणता त्या आनंदाची चवही मी घेतली नाही, त्यामुळे काय निसटलं याचं मला अजिबात दुःख नाही.'

बोलता बोलता वेळ कसा गेला हे कोणालाच समजलं नाही. विमल चहा झाल्याचा निरोप घेंऊन आली, म्हणजे चार वाजले होते. 'आजच्या दिवस आमचा चहा इकडेच आण' असं मालतीबाईंनी तिला सांगितलं. विमलनं चहा आणेपर्यंत दोघी गप्प गप्पच होत्या. चहाबरोबर विमलनं निरोपही आणला,

'आज्जी, कोणतरी भेटाया आलंय तुमाला. इकडंच आनलं मी त्यानला. चहा बी जास्तीचा आनलाय.'

मालतीबाई व विभा सावरून बसल्या. शिष्टाचार म्हणून विभा बाहेर जायला निघाली पण मालतीबाईंनी तिला तिथेच थांबण्याची खूण केली. तोच पाहुणे समोर आले.

मालतीबाई अवाक् झाल्या. 'अभिषेक तू?' त्या आनंदाश्चर्यानं उद्गारल्या.

'हो आजी; आणि ही माझी होणारी बायको, उल्का.'

तिनं पुढे वाकून नमस्कार केला. नंतर अभिषेकनंही. दोघांना मनःपूर्वक आशिर्वाद देऊन मालतीबाई बघतच राहिल्या. काय बोलावं हेच त्यांना सुचत नव्हतं. आतल्या आत कुठेतरी खूप बरं वाटत होतं. मन भरून येत होतं. गळ्याशी काहीतरी दाटून आलं होतं.

दोघंही बसले, अभिषेक खुर्चीवर व उल्का मालतीबाईंशेजारी कॉटवर.

'आजी, आम्ही दोघं तुला बोलवायला, ..... नव्हे न्यायलाच आलो आहोत.'

'अरे मी येणारच आहे लग्नाला....'

'नाही आजी, ...उल्का तूच बोल ना....' अभिषेक म्हणाला.

'आजी, तुम्ही आता आमच्याजवळ आमच्या घरीच रहायला यायचं आहे; कायमचं...माझं अन् अभीचं ठरलंय तसं...' उल्का म्हणाली. तिच्या बोलण्यात आपुलकी आणि आर्जव होतं.

'अरे...अगं...पण..' मालतीबाई अडखळत होत्या.

'पण बीण काही नाही. तुमचं आम्ही काही ऐकणार नाही. नाही का रे, अभी?'

'आजी, आम्ही स्वतंत्र फ्लॅट घेतला आहे. आत्ता लग्न पार पडेपर्यंत तू आई-बाबांच्या घरी रहायचं ; आणि नंतर आमच्याबरोबर आमच्या फ्लॅटवर. त्या दोघांनाही मी हे सांगितलंय, आजी. त्या दोघांचीही या निर्णयाला संमती आहे याला. आजी, तुला माहीत नाही, पण आई-बाबाही आता खूप बदलले आहेत.'

अभिषेक बोलत राहिला, ' आजी, उल्काचे विचार खूप वेगळे आहेत. तिला जेव्हा तुझ्याबद्दल प्रथम कळलं, तेव्हा तिनं स्पष्टच सांगितलं की आजींना आपण आपल्या घरी आणायचं, म्हणून. घरात मोठं माणूस असलं की घर आशिर्वाद देतंय असं वाटतं. आपल्या आनंदाचं, आपल्या यशाचं खरं कौतुक आपल्या मागच्या पिढीला असतं. त्यांना दूर करून आपण आपलंच सुख दूर सारत असतो....आजी, मलासुद्धा तुझ्याबद्दल ओढ होती. पण कळत नव्हतं, कसं वागावं ते. पण आता नक्कीच मी माझे निर्णय ठामपणे घेऊ शकतो.'

'तुझा बाबा-आई कसे आहेत....?' मालतीबाईंनी मधेच विचारलं.

'तुला म्हटलं नं मी, आजी; ते आता खूप बदललेत म्हणून. पण तरीसुद्धा तुला कुठलाही मानसिक त्रास नको म्हणून मी नि उल्कानं स्वतंत्र फ्लॅट घेऊन तुझ्यासह रहायचं ठरविलं आहे.....'

'अभिषेक, जरा ऐक. तू निर्णय घेतलास, मला आनंदच आहे; पण आता मला सवय झालीय इथं रहायची, इथल्या वातावरणाची, इथल्या समवयस्क सहकाऱ्यांची. मी इथं रहाते याचं मला आता जराही दुःख वाटत नाही. मालती बाई म्हणाल्या.

'आजी, तुम्ही हव्या आहात आम्हाला आमच्या संसारात.....' उल्कानं भावपूर्ण आवाजात सांगितलं. मालतीबाईंनी तिच्या पाठीवरून हात फिरवला, प्रेमानं. नंतर थोडं थांबून पुढं म्हणाल्या,

'तुम्ही दोघांनी तुमचा निर्णय सांगितलात; पण मलाही थोडा विचार करायला वेळ द्या. आयुष्यात मी इतरांचेच निर्णय अंमलात आणत राहिले आहे. अर्थात तुम्हा दोघांची काहीच चूक नाही त्यात; किंवा संबंधही नाही. पण मी विचार करून मगच काय ते ठरवीन. चालेल नां, उल्का? निर्णय कधीच भावनेच्या भरात घ्यायचे नसतात. चला, आपण मघाशी आणलेला चहा घेऊ.'

विभानं चार कप काढले,उल्कानं थर्मासमधला चहा त्यात ओतायला सुरुवात केली.चौघेही गप्प होते. चहाचे घोट घोत होते. चौघांच्या मनात काय विचार चालले होते याची मात्र परस्परांना काही कल्पना नव्हती.

****

# स्वामी

पहाटेचे साडेचार वाजले. दिवस थंडीचे. सारं चंदनपूर निद्रेच्या उबदार पांघरुणात गुरफटलेलं होतं. परन्तु ज्ञानमठाचा पूर्व दरवाजा नित्याप्रमाणे साडेचारच्या ठोक्याला उघडला. कंदिलाचा मंद उजेड बाहेर आला. त्या उजेडापाठोपाठ वेदमहाराज मठाच्या पायऱ्या उतरू लागले. त्यांची ही नगरप्रदक्षिणेची वेळ होती. शिष्य अंबादास विनम्रपणे पुढे चालत होता. हातातल्या कंदिलाच्या उजेडानं स्वामींच्या अनवाणी पायांखालचा मार्ग शक्य तितका उजळ करण्याचा त्याचा अटोकाट प्रयत्न होता. म्युनिसिपालिटीचे दिवे रोजच्यासारखे निरर्थक जळत होते.

नगरप्रदक्षिणेचा मार्ग परंपरेनं ठरलेला होता. गेल्या कित्येक वर्षात त्यात बदल नव्हता. फरक इतकाच की पूर्वीचे कच्चे रस्ते आता डांबरी झाले होते; रुंद झाले होते आणि त्यावरच्या खाणाखुणाही बदलल्या होत्या. आता त्या मार्गावर हॉटेलं होती; थिएटरं होती; अभक्ष्य भक्षणाच्या तरतूदीचं खाटकाचं दुकानही होतं. पण स्वामीमहाराजांचा मार्ग तोच होता. ठरलेला. कारण त्यामागे मठाची परंपरा होती आणि परंपरेला फार महत्त्व होतं. मठाच्या अनुयायांनी ते मेहनतीनं जपलेलं होतं. काळाची चक्रं गतिमान असल्यानं काळ बदलला. स्वामी बदलले; पण ज्ञानपीठाची परंपरा काडीमात्रही बदलली नाही; आणि या गोष्टीचा मठाच्या अनुयायांना सार्थ अभिमान होता.

मठाचे अधिपती स्वामी वेदमहाराज सवयीप्रमाणे झपाझप पावलं टाकत होते. अनवाणी पायांना काही बोचून न घेण्याची सवयच झाली होती. काही बोचलंच तरी मार्गक्रमण करीत राहण्याचं व्रत त्या पावलांनी स्वीकारलं होतं. म्हणून तर ती पावले वंदनीय होती, पूजनीय होती. भाविक त्या पावलांना स्पर्शून वंदन करण्यात, त्या पावलांवर मस्तक ठेवण्यात स्वतःला

धन्य समजत होते. अंबादास स्वामींचा निकटवर्ती होता. तत्परतेनं सेवा करणं यातच त्याला आनंद होता.

नगरप्रदिक्षणेच्या मार्गावरच नदीचा घाट होता. तिथं पोहोचलं की स्वामी नदीला वंदन करून पाण्यात उभे राहात. उगवत्या सूर्याला अर्घ्य देत; आणि नंतर ठरलेल्या मार्गानं विष्णुमंदिराकडे जात. मंदिराचे दरवाजे स्वामींसाठी मुद्दाम उघडले जात. देवदर्शनानंतर प्रदक्षिणा पूर्ण होई व स्वामी मठाकडे परतत. त्यावेळी उन्हं चांगली वर आलेली असत.

आजही हा सारा नित्यक्रम असाच पार पडणार होता हे नक्की. त्याप्रमाणेस्वामी घाटावर आले. अंबादासनं कंदिलाची वात खूप बारीक केली नि तो पायऱ्यांवर बसून राहिला. स्वामी नदीमध्ये उभे राहिले. पूर्वदिशा सोनेरी होऊन चकाकत होती. स्वामींनी ओंजळीत पाणी घेतलं आणि डोळे मिटले..

ज्ञानमठाची परंपरा पुढे चालविण्याचं व्रत घेतलेले स्वामी; स्वामी वेदमहाराज. पण स्वामी-महाराज या शब्दाशी परंपरेनं जोडली जात असलेली किती बाह्यलक्षणं त्याच्याजवळ होती? लांब वाढलेल्या जटा नव्हत्या; वाढलेली दाढी नव्हती; एवढंच काय, त्यांचं उतारवयही झालेलं नव्हतं! वेदमहाराज अवघे तिशीचे. तरुण. तडफदार. रंगानं उजळ. मुख्य म्हणजे शास्त्राचे पदवीधर. तरुण वेद हा उद्या स्वामी वेदमहाराज होईल, हे पाच वर्षांपूर्वी त्याच्याही ध्यानीमनी नव्हतं. ज्ञानपीठाचे त्याच्याआधीचे अधिपती वेदचे काका होते. शुद्ध आचरण, ब्रह्मचर्यपालन आणि ईश्वरसेवा ही मठाची मुख्य सूत्रं होती. वेद हे त्याचं नाव त्याच्या काकांनीच ठेवलं होतं. काका विवाहित होते पण मठाच्या गादीवर बसल्यावर त्यांनी संन्यास घेतला होता, म्हणजे तसा नियमच होता. एके दिवशी अचानक काका हृदयविकारानं निवर्तले. पळशीकर घराण्यातील कोणता पुरुष आता ही गादी सांभाळेल, हा ट्रस्टींपुढे प्रश्न होता. तो सोडविल्याशीवाय काकामहाराजांवर अग्निसंस्कार करता येणार नव्हते. मठाची परंपरा आणि घटनाही तशीच होती.

वेदच्या विधवा मातेला वेदचं नाव सुचविण्याचं धारिष्ट्य कुणाच्यानं होत नव्हतं. पण तशी वेळच आली नाही. त्या समंजस स्त्रीनं परंपरेच्या जपणुकीकरता सांगितलं, 'बाळ, तू पुढे हो. '

तिला माहित होतं, तिच्या आज्ञेमुळे तिनं वेदच्या आकांक्षांचा, कर्तृत्वाचा, तारुण्याचा बळी घेतला जाणार होता; पण हे अपरिहार्य होतं, विधिलिखित होतं. परंपरेला आव्हान देण्याची त्या माउलीमध्ये नव्हती. वेद सुन्न झाला होता. जाणिवा बधीर झाल्या होत्या. काही शब्द फुटण्यापूर्वीच घाईघाईनं संन्यास देण्याचे संस्कार व सोपस्कार त्याच्यावर करण्यात आले. शास्त्रशुद्ध पूजा करून त्याला मठाच्या गादीवर बसविण्यात आलं; आणि नंतरच काकामहाराजांवर अग्निसंस्कार करण्यात आले.

स्वामी वेदमहाराजांचा ठराविक नित्यक्रम सुरू झाला. विचार करायला वावच नव्हता. संन्यासग्रहणानंतर अन्य विचार निषिद्धच होता. आता या चाकोरीतून फिरण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. नगरप्रदक्षिणा, देवदर्शन, भजन, नंतर मितभोजन, विश्रांती, भक्तांसह धर्मग्रंथवाचन, संध्याकाळी पुन्हा देवदर्शन, रात्री धान्यफराळ, मग स्वतःसाठी आध्यात्मिक वाचन असा दिनक्रम चालू होता; गेली पाच वर्षं.

लहानथोर पायांवर डोकं ठेवत होते. त्यांनी मनाई करूनही उपयोग होत नव्हता. ‘हे वंदन मी का स्वीकारायचं? मला खरोखर अधिकार आहे का? माझी ती योग्यता आहे का?’ या प्रश्नांची उत्तरं खुद्द स्वामींनाच माहीत नव्हती. लोक मात्र वाढत्या संख्येनं भेटायला येत होते. एवढ्या लहान वयात महाराजांनी संन्यास घेतला, सर्व सुखाचा त्याग केला ही गोष्ट त्यांच्या मनात आदर निर्माण करण्यास पुरेशी होती. तरुण उमद्या वेदनं मिळविलेल्या पदव्यांची भेंडोळी कुठेतरी कोपऱ्यात धूळ खात पडूनहोती. आता त्यांची किंमत साध्या कोऱ्या कागदाइतकीच नगण्य होती.

नदीच्या पात्रात उभे राहिलेल्या स्वामींचे डोळे अद्याप मिटलेलेच होते. सूर्य क्षणाक्षणाला कणाकणानं वर येत होता. अंबादासनं कंदिलाची ज्योत मालवून टाकली. स्वामींचं अर्घ्यदान संपण्याची तो वाट पाहात होता. सूर्यप्रकाशात स्वामी वेदमहाराजांचा चेहरा अधिकच

तेजःपुंज दिसत होता. अंबादासचं मन भक्तीनं भरून आलं. 'नित्याच्या साधनेमुळे स्वामींचं सामर्थ्य दिवसेंदिवस वाढतंय्' या विचारानं तो अधिकच लीन झाला. मनात असा विचार आला असतांनाच त्याला जाणवलं, आज स्वामींना अर्घ्यप्रदानास जरा जास्तच वेळ लागला!

अंबादासचं काय, स्वतः स्वामींनाही जाणवत होतं. त्यांचं चित्त आज एकाग्र होत नव्हतं. आध्यात्मिक साधना करतांना मनात दडपून टाकलेले विचार पाच वर्षांनी हळूच डोकं वर काढत होते.. हा तेजोगोल सूर्य. याच्या ऊर्जेमुळे जीवसृष्टीचं अस्तित्व आहे. पण सूर्याला देवता कशासाठी मानायचं? देव-देवता. या कल्पनांशिवाय सत्य शोधता येऊ नये काय? ..

स्वामी विष्णुमंदिरात पोहोचले. गाभाऱ्याची दारं त्यांच्यासाठी उघडली गेली. काळ्या पाषाणाची ती घोटीव मूर्ती त्यांनी कितीदातरी पाहिली होती. विशेष दिवशी पंचामृताचं स्नानही स्वामींच्या हस्ते तिला घातलं गेलं होतं. पण आज स्वामींना त्या मूर्तीमध्ये फक्त पाषाण दिसत होता. सवयीनं त्यांनी वंदन केलं पण तसेच मूर्तीकडे पाहात उभे राहिले. त्यांना जास्त वेळ थबकलेलं पाहून जवळ असलेला पुजारीही किंचित अस्वस्थ झाला. आपल्या मनातले अश्रद्ध विचार त्याला आणि अंबादासला कळले तर! या विचारानं स्वामी मनात चपापले, आणि नेहमीच्याच झपाट्यानं मठात परतले. पादप्रक्षालन करून आपल्या आसनावर स्थानापन्न झाले आणि मागच्या मखमलवेष्टित लोडावर विसावले. डोळे मिटून.

बराच वेळ गेला. अंबादासनं पेल्यात आणून ठेवलेलं गरम दूध थंड होऊन गेलं. स्वामींच्या तंद्रीचा भंग करणं हे कोणीही केलं नसतंच. दूध न घेता आज महाराज..? शिवाय अर्घ्यदान. देवदर्शन.. इथेही आज स्वामी रोजच्यासारखे नव्हते! अंबादास अस्वस्थ झाला. तेवढ्यात स्वामींनी डोळे उघडले.

'महाराजांची प्रकृती.. '

'छे! छे! 'अंबादासनं अडखळत केलेल्या प्रश्नाला स्वामींनी मधेच काटलं. 'मी ठीक आहे. भजनाची सर्व सिद्धता झाली? '

‘होय महाराज! ’

‘मग चला.. ’

‘पण महाराज, आज रविवार आहे ना! सर्वजण टीव्हीवरचं रामायण पाहून मगच येणार! ’

‘हं ऽऽ‘

मठात टीव्हीच काय रेडिओही नव्हता. वर्तमानपत्रही येत नव्हतं स्वामींनी या गोष्टींकडे आकर्षित होणं उचित नव्हतं. त्यामुळे कदाचित त्यांचा मनोभंग होईल, साधनेत व्यत्यय येईल म्हणून मठाधिपतीने अध्यात्माखेरीज कोणतंही वाचन करू नये असा दंडक होता. संन्याशाला या उपाधींची काय गरज? असा सोयिस्कर विचार करून आपल्या संस्कृतीचा, आपल्या धर्माचाआणि देवाचाही सर्व भार स्वामींवर सोपवून सर्व मंडळी टीव्ही वरचं रामायण पाहून मग भजनासाठी येणार होती. तो कार्यक्रम पाहाणं हा त्यांच्यामते त्यांचा धार्मिक सदाचार होता!

अंबादासनं भजनाची सारी तयारी केली होती. मठातल्या मुख्य सभागृहात भजन होत असे. सभागृह अष्टकोनी व प्रशस्त होते. देवादिकांच्या तसबिरी आणि मठाच्या सर्व अधिपतींचे फोटो, यांनी भिंती सजल्या होत्या. चंदनपुरातील मुख्य विष्णुमंदिरात असलेल्या मूर्तिची छोटी प्रतिकृती असलेली विष्णुमूर्ती एका चंदनी देव्हाऱ्यात ठेवलेली होती. बरोबर त्यासमोरच्या भिंतीलगत स्वामी महाराजांचं आसन होतं. चातुर्मासात मठातल्या भजनासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थितअसत. या चार महिन्यात परगावहूनसुद्धा भक्तमंडळी मुक्कामाला येऊन राहात व देवभक्तीची राहिलेली कसर भरून काढत. देवाच्या पायाशी येऊन राहिलं, तासन्तास रांगेत उभं राहून दर्शन घेतलं, जमल्यास ऐपतीप्रमाणे महापूजा केली, यथाशक्ती दानधर्म केला म्हणजे वर्षभरातल्या पापांचं जणू काही प्रायश्चित्त झालं, अशा विचारानं आनंदून जाण्यासाठी अन् समाधान मिळविण्यासाठी लोक इथं येऊन राहात असावेत. अर्थात्, स्वतःच्या जीवनात आनंद

निर्माण करण्यासाठी कोणी काय मार्ग शोधावा, हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे! मुद्दा इतकाच की या कारणानं मठात अधिक वर्दळ असे. ती तर आवश्यकच होती; कारण या भाविकांच्या दानशूरपणावरच मठाची आर्थिक भिस्त होती.

तीनदा ओंकार झाल्यावर ‘हरेराम.. ’ च्या गजरात भजनाला सुरुवात झाली. वेदमहाराज व मठातील अनुयायी यांनी गोल फेर धरला होता. टाळ मृदंगाची लय वातावरण भक्तिमय करून टाकत होती. भाविकही साथ देत, गोल फिरत साथ देत होते. गजरानंतर स्वामी आसनस्थ झाले व अनुयायांनी भजने म्हटली. विशेष म्हणजे त्यात सर्वधर्म भजनाचाही समावेश होता. ती फेरी पूर्ण झाल्यावर आता भाविकांनाही भजन गाण्याची संधी मिळणार होती. त्याप्रमाणे दोघांचं गायन झालं. त्यानंतर माईक एका स्त्रीनं घेतला व आर्तस्वराची तान उमटली. भाविक एकाग्रतेनं ऐकू लागले. भजन सुरू झालं..

‘देनेवालेरे, तूने तो सबकुछ दिया;

क्या करें हम को तो कुछ ना मिला..

सर्व नजरा त्या दिशेनं वळल्या. कान उत्सुक झाले व सारे तन्मयतेनं ऐकू लागले. एक तरुणी गात होती. त्या देखण्या रूपालावर सुरेल, गोड आवाजाची देणगीही? देनेवालेने तो सबकुछ दिया था! अंबादासला माहीत झालं होतं, त्या तरुणीचं नाव आसावरी होतं. आपल्या आईबरोबर काही दिवसांपासून ती चंदनपुरात येऊन राहिली होती. गेले काही दिवस रोज मठात येऊन भजनं गात होती. स्वामींनाही ते माहीत होतंच. आईच्या मागून तीही स्वामीमहाराजांच्या पायी मस्तक ठेवून भक्तिभाव प्रकट करीत होती. या सगळयात कुठलीच गोष्ट नवीन नव्हती. असे कित्येक भाविक स्त्री-पुरुष, सर्व वयांचे व विविध स्तरातले लोक मठात नित्य येत-जात होते. पण..

नवं नव्हतं, वेगळं नव्हतं ते अंबादासला. स्वामीनाही नव्हतं, पण शांत सरोवरात कुठेतरी खडा पडला होता.. वलयामागून वलयं उमटत होती. पृष्ठभागावर होती हे खरं! पण मनाची एकाग्रता ढळली होती, हे स्वामींना स्वतःशी नाकारता येत नव्हतं गेल्या पाच वर्षात जे

घडलं नव्हतं, निग्रहानं जे घडू दिलं नव्हतं तो निग्रह रेतीसारखा भुळभुळ गळू लागला होता. आसावरीनं वंदनासाठी पायांवर मस्तक ठेवलं, तेव्हा महाराजांचे पाय एकाएकी गार पडल्यासारखं त्यांना वाटलं. कितीही अवांछित असल्या तरी सबंध शरीरातून झिणझिण्या आल्या होत्या.. ही आंदोलनं न झेपल्यामुळे स्वामींच्या घशाला कोरड पडली, ओठ सुकले. अर्थात् दुसऱ्या कोणाला यातलं काहीच जाणवलं नाही. पण स्वामींनी जाणलं होतं. वेळ सत्त्वपरिक्षेची आहे!

आसावरी गात होती. तिचा गोड सुरेल आवाज कानात मधाप्रमाणे ठिबकत होता. स्वामींनी डोळे मिटलेले होते पण मनःचक्षूंना बंद करण्याचं सामर्थ्य त्यांच्याजवळ नव्हतं. त्या चक्षूंपुढून आसावरीचा चेहरा हलत नव्हता. 'निसर्गेच्छा बलियसी' याचं प्रत्यंतर येत होतं. आज अर्घ्यदान करतांनाही सूर्य हा आसावरीच्या भाळावरील रेखीव टिळा आहे, कुंकुम तिलक आहे असा त्यांना भास होऊ लागला होता. नंतर आसावरीचा चेहरा तिचं रूप आकाशभर व्यापून राहिलं होतं. स्वामींना स्वतःचा पराभव मनाशी कबूल करावा लागला.

त्यांच्या मनात आलं, 'माझ्या मनात हे तरंग उठले यात माझी चूक तरी कोणती? धर्मग्रंथात संन्यासाश्रम हा सर्व आश्रमांच्या शेवटी सांगितला आहे. योगायोगानं मला अवेळी संन्यास घ्यावा लागला, म्हणून मनातले विकार लगेच नाहीसे होतील? रामदासांनीही, संन्यास संसार-तृप्तीनंतर घ्यावा असं म्हटलं आहे. इंद्रियदमन करून संन्यास घेण्यापेक्षा इंद्रियभोगाकडे व सर्व सुखांकडे जाणीवपूर्वक पाठ फिरवणं हे केव्हाही श्रेष्ठ आहे..! .. पण मी हे माझा तोल ढळण्याचं समर्थन करीत आहे का? ..

स्वामींची विचारशृंखला तुटली. आसावरीचं गायन थांबलं होतं. आणखी काही भजनं होऊन लोक स्वामींना वंदन करून जाऊ लागले. आसावरी वंदनासाठी स्वामींकडे येऊ लागली. दोघांची दृष्टादृष्ट झाली. 'आऽहाऽ! किती सुंदर' स्वामींणी मनातच उद्गार काढला. तिचे डोळे म्हणजे अथांग डोह होते. काळेभोर, निश्चल! पण सतेज. स्वामींना विष्णुमूर्तीच्या कोरीव डोळयांची आठवण झाली. आसावरीने केलेल्या पदस्पर्शामुळे स्वामी भानावर आले, म्हणण्यापेक्षा

त्यांचं भान हरपलं म्हणणंच योग्य होतं. कारण त्या स्पर्शाने देहात हजारो वीणा एकदम वाजू लागल्या होत्या.. गेले काही दिवस हे असंच होत होतं. किनारा सुटत चालला होता.

"अंबादास, ' स्वामींनी हाक मारली. 'नैवेद्याचा संकल्प सोडून ताट तू घे. मी आज जेवणार नाही. '

स्वामींना कोणीच कारण विचारू शकणार नव्हतं. ते वरच्या मजल्यावरील खोलीत विश्रांतीसाठी निघून गेले.

मात्र विश्रांतीऐवजी स्वामी विचार करत पडले होते. आसावरीच्या निमित्ताने त्यांना एवढंच कळून चुकलं होतं की त्यांच्या मनाला व देहाला अजून स्त्री सहवासाची इच्छा होती. संन्यास देतांना केलेले शास्त्रोपचार त्या इच्छेवर मात करू शकले नव्हते. संस्कारांनी संन्यासीपण दिलं पण आतलं माणूसपण अजून जिवंतच होतं. मनावर संन्यासी वृत्ती फक्त वस्त्राप्रमाणे बाहेरून लपेटलेली होती. आत मन तसंच होतं. माणसाचं. विकारी. किती अवघड होतं हे संन्यासी व्रत!

मग पुन्हा उलट्या मार्गानं जावं का? संन्यास सोडून गृहस्थाश्रम स्वीकारावा का? विठ्ठलपंतांनी नव्हता स्वीकारला? तेव्हा त्यांना समाजाने वाळीत टाकलं. आज तर विसावं शतक संपत आलंय्. ज्ञान वाढलंय्. विज्ञानानं अंतराळ गाठलंय्.. काय हरकत आहे?

पण हे संस्कार? हे प्रवाहाविरुद्ध पोहू देतील? का उलट शक्ती काढूनघेतील? मी जर विकारांचं असं प्रदर्शन केलं तर लोक काय म्हणतील? ज्यांनी माझ्यावर श्रद्धाठेवली त्यांच्या श्रद्धेला असा तडा कसा जाऊ देऊ? परंपरेनं चालत आलेल्या या गादीचा मी अवमान करू? नाही ते शक्य नाही..!

पण माझा स्वतःचा तरी या गादीवर किंवा नित्यक्रमातल्या गोष्टींवर किंवा पाषाणमूर्तीवर खराखुरा व मनापासून विश्वास आहे का? विचारांचे प्रवाह उलटसुलट वाहत होते. सायंकाळच्या दर्शनाला नेहमीप्रमाणे जायलाच हवं होतं. स्वामी विष्णुमूर्तीसमोर उभे राहिले.

आज प्रथमच त्यांना हेवा वाटला. विष्णूशेजारी लक्ष्मीचीही मूर्ती आहे की! त्यांच्या मनात आलं राम, कृष्ण हीदेखील विष्णुचीच रूपं मग आपण ईश्वरभक्तीसाठी, या गादी साठी संन्यास घेतला पाहिजे, असा नियम का? मठाचाही असा दंडक का असावा? स्वामींनी विष्णुपदांवर मस्तक ठेवलं पण चित्त भरकटलेलं होतं..

स्वामी परत आले तेव्हा मठात दिवे लागलेले होते. नेहमीप्रमाणे स्वामी आसनस्थ झाले नाहीत. अंबादास दिङ्मूढ होऊन फक्त स्वामींच्या आसपास घुटमळत होता. पाठीमागे हात बांधून स्वामी फेऱ्या मारीत होते.

'स्वामी, धान्यफराळ आणला आहे. ' एकानं म्हटलं

'नको, आज इच्छा नाही. '

अंबादासला राहवलं नाही. 'महाराज, आज सकाळीही भोजन केलं नव्हतं.. थोडंतरी..'

'बरं, फक्त दूध आण' स्वामी म्हणाले. मी आत्ताच वरच्या मजल्यावर विश्रांतीसाठी जाणार आहे. तुम्ही पुढले नित्य कार्यक्रम उरकून घ्या. '

'जी'

स्वामी वर निघून गेले. बऱ्याच उशिरा अंबादासनंही अंग टाकलं.

अंबादासला जाग आली तेव्हा तो ताडकन् उठला. पहाटेचे चार वाजून गेले होते. आज स्वामींचं स्नानाचं पाणी काढायला उशीर होणार; आणि नगरप्रदक्षिणेलाही. अरेच्या! पण स्वामींनी मला उठवलं का नाही? स्वामींची कुठे चाहूल लागते हे तो शोधू लागला. पण सगळं सामसूम होतं. अंबादास धावतच जिन्याच्या पायऱ्या चढला. स्वामी तिथंही नव्हते. म्हणजे उठले असतीलच. पण हे काय? बिछान्याला सुरकुतीही नाही; शालीची घडीही तशीच! . अंबादासनं इतर सहकाऱ्यांना हाका मारून उठवलं. महाराज आज स्नानाशिवाय एकटेच तर प्रदक्षिणेला गेले

नाहीत? अंबादासनं कंदील लावला. मठात धावपळ सुरू झाली. अंबादास बाहेर पडला पळतच मार्ग शोधून परत आला. कुणीतरी मंदिरात पुन्हा पुन्हा जाऊन आलं. महाराज कुठेच नव्हते!

आता सर्वांचीच पाचावर धारण बसली. ट्रस्टींना निरोप गेले. चंदनपुरात बातमी वाऱ्यासारखी पसरली. मठातील विहीर व नदीपात्राचाही शोध घेण्याचं कुणीतरी सुचवलं.

दिवस उगवला तसा मावळू लागला. अंबादास हताश होऊन आसनासमोर बसला. तेवढ्यात त्याचं लक्ष मखमली लोडाखाली गेलं. तिथं काहीतरी होतं. रुद्राक्षांची माळ! महाराजांच्या गळयात रुळणारी. परंपरागत मठाधिपतींच्या गळयात असणारी. अंबादासनं माळ मस्तकी टेकवली. मठात, मठाबाहेर लोकांनी गर्दी केली होती. आता काय करायचं? असा प्रसंग पूर्वी कधीच आला नव्हता!

विनंती करूनही भाविक परत जात नव्हते. शेवटी पवित्र आसनाला आणि रुद्रमाळेला वंदन करून आम्ही परत जातो, असे म्हणून परतायला तयार झाले. एकएक जण येऊलागला. आश्चर्य म्हणजे या सगळया गर्दीतून आसावरीही पुढे आली. तिनं आसनावर डोकं टेकवलं, माळेनं डोळयांना स्पर्श केलाआणि ती दूर जाऊ लागली..

तिला कल्पनाही नव्हती की एका संन्याशाला त्या गादीवरून उठविण्यास ती कारणीभूत ठरली होती! पण हेही पूर्णतः खरं नव्हतं; दुष्ट परंपरेनं एका माणसाला माणसातून उठवलं होतं, हेच खरं!

स्वामी महाराज पुन्हा कधीच कुणाच्या दृष्टीस पडले नाहीत. आता मात्र मठाची गादी रिकामी असली तरी चालतं आहे; त्यानंतर विपरीत काहीच घडलं नाही, म्हणजे परंपरा मोडली तरी चालतं, हे सर्वांना कळलं आहे! मठाची घटना बदलावी की काय, ती कशी असावी याबाबत ट्रस्टींचं एकमत होत नाही, असं चंदनपुरात बोललं जात असल्याचं ऐकिवात आहे, इतकंच!!

****

# डबे

अंजी दारात उभी राहून वाट पाहात होती. गणाभाऊ अजून आला नव्हता. सकाळचे नऊ वाजले होते. आता लोकांना डबे वेळेवर कसे मिळणार? उशीर झाला की मग त्यांची ओरड ऐकून घ्यावी लागते. दोघांचे फोन आलेच होते, अजून कसा डबा पोचला नाही म्हणून. अंजीच्या आत-बाहेर फेऱ्या चालूच होत्या. तेवढ्यात कोपऱ्यावर गणाभाऊची सायकल वळतांना दिसली.

ओ, गणाभाऊ, काय हा उशीर! तिकडे मानसं बसली असतील ओरडत.

जास्त न बोलता गणाभाऊनं मोठाल्या दोन पिशव्यात दहा डबे भरले. तीन पुडी. सायकलच्या दोन्ही हॅण्डलला पिशव्या अडकवून तो न बोलता निघाला. अंजी बडबड करतच होती. तिचं ऐकत बसला असता तर आणखीनच खोळंबा झाला असता. मग परत कामावर जाणाऱ्या लोकांचा ओरडा. गणाभाऊ सायकल मारत निघाला. जुनीपुराणी सायकल म्हणजे खटाराच होता तो. मागे कुणीतरी लिहिलं होतं तसं, घंटी सोडून तिचे सर्व भाग खडखड वाजत होते. गणाभाऊ दिसेनासा होईपर्यंत अंजी कमरेवर हात ठेऊन बाहेरच्या सहा इंची उंच असलेल्या फुटपाथवरच उभी राहिली. शेजारची पुष्पी म्हणाली,

लई लेट झालाय् आज गणाभाऊला. म्हातारा झाला बघ आता. सायकल बी चालवंना त्येच्यानी.

अंजीनं ऐकलं न ऐकल्यासारखं केलं. पण तिलाही वाटत होतं की गणा आता थकलाय्.

*आज पाच वर्षं झाली अंजीच्या नवऱ्याला, प्रकाशला जाऊन. तो कंपनीत कामाला होता. काय काम करायचा ते अंजीला एवढं नक्की ठाऊक नव्हतं. पण मशीनवर दहा तास उभं राहावं लागायचं इतकंच तिला माहीत होतं. रोज घरी आल्यावर म्हणायचा,*

*अंजे, पायाला जरा तेल चोळ गं! तुझ्या हातात गुण आहे बघ. तू मालिश केलं की पुन्ना ताजातवाना होइन बघ! रातच्याला कळेलच तुला!असं म्हणून तिच्याकडे पाहात मिस्किल हसायचा.*

*अंजी अन् प्रकाशच्या लग्नाला दहा वर्षं झाली होती, तो गेला तेव्हा. अंजीचं वय फक्त सव्वीस! सोळावं लागल्यावर लगेचच तिच्या बा नं तिला बाशिंग बांधलं. प्रकाश तिच्या दूरच्या नात्यातलाच होता. मुंबईला. कंपनीत. वयात जरा जास्त अंतर होतं, आठ वर्षांचं. पण तो काही मोठा मुद्दा नव्हता. अंजीला प्रकाश आवडला होता. तगडा, रुबाबदार, पुरुषी! अंजी मुंबईला, लोअर परळला येऊन वस्तीत राहू लागली. दिवस मजेत चालले होते. प्रकाश अंजीवर जीव टाकत होता. तिला माहेरी पाठवायला पण राजी नसायचा. तिच्याशिवाय चैनच पडत नव्हतं त्याला. अंजीला फुलासारखं जपत होता. सकाळी बाहेरच्या नळावरून पाणी आणण्यापासून रात्री बिछाना घालण्यापर्यंत शक्य तेवढी कामे करायचा. तिला करावं लागू नये म्हणून. तीही सकाळी त्याचा डबा करायची, अंघोळीचं पाणी तापवून ओतून द्यायची, ब्रशवर पेस्टही लावून ठेवायची. आठ बाय दहाच्या दोन खोल्यात दोघं राजाराणीसारखी सुखी होती. एकाला एक लागून असलेली घरं; तिथं एकांताला मोकळेपणा कुठून असणार? पण या दोघांना कधी अडचण वाटली नाही. रात्र प्रेमाच्या धुंदीत संपली, तरी प्रकाश तिच्या भोवती घोटाळत असायचा, कंपनीत जायला निघेपर्यंत! तिनं हातात डबा आणून दिला की त्याला संधी मिळायची तिला मिठीत घुसळून घ्यायची!*

तो गेला की तिला काही उद्योग नसायचा. पुढे पुढे तिनं साड्यांना हाताने फॉल लावण्याचं काम सुरू केलं. आजूबाजूच्या बायका आणून द्यायच्या नव्या साड्या तिच्याकडे. वेळही जायचा आणि चार पैसेही मिळायचे. साडेसहाला प्रकाश आला की दोघं एकमेकात रमून जायची. सुट्टीच्या दिवशी हमखास प्रकाश तिला फिरायला, मुंबई दाखवायला घेऊन जायचा. कधीतरी दोघं नवीन आलेला सिनेमा बघायला जायचे. अंजीला सिनेमा खूप आवडत असे, म्हणून. अशी जिवाची मुंबई करणं चाललं होतं. वर्षं सरत होती. दोघं कधी आपल्या गावीही जात होती. पण रजा फारशी नसल्यामुळे उडतउडतच घरच्यांच्या भेटी होत. मात्र दोघांचे आई-वडील आपण आजी-आजोबा होण्याची वाट पाहात होते.

तीच एक उणीव अजून भरून निघत नव्हती. प्रकाशला काही वाटायचं नाही.तो म्हणायचा, आपल्या दोघांच्या मध्ये नकोच कुणी तिसरं! मग तुझं लक्ष माझ्यावरून उडंल, अन् त्या पोरावर लागंल!

ती म्हणायची, पण आपल्या दोघांचंच असंल ना ते! मुलगा, मुलगी काहीबी चालंल, पण डिट्टो तुझ्यासारखंच व्हायला पायजे.

आणखी काही वर्षं गेली. मित्रांच्या सल्ल्यावरून दोघांनी तपासण्या करून घेतल्या. मात्र आलेले रिपोर्ट समाधानकारक नव्हते. दुसरे, तिसरे असे बरेच डॉक्टर झाले. पण परिस्थिती दु:खदायकच होती. दोघं एकमेकांना सांभाळून घेत होती. दोघांचं प्रेम अजिबात कमी झालं नव्हतं. उलट दुसऱ्याला त्रास होऊ नये अशी काळजी दोघेही घेत होते. ट्रीटमेंट चालू होती पण परिणाम दिसत नव्हता. डॉक्टरांनी सांगितलं होतं की कधीकधी अशी केस पाहायला मिळते की, दोघेही पूर्ण नॉर्मल असतात; पण कंपॅटिबिलिटी नसते. याचा अर्थ अंजी किंवा प्रकाश, दोघांनाही नीट कळला नव्हता. कळून घेण्याची त्यांना जरूरही वाटत नव्हती. त्यांची केमिस्ट्री पुरेपूर जुळत होती.

आणि अचानक एक दिवस प्रकाश कंपनीत काम करत असतांनाच त्याला जोरदार हार्टॲटॅक आला. इतका की उपचाराला सवडच मिळाली नाही. त्याआधीच सारं संपलं होतं. अंजीला हा धक्का सहन करणं जिवापलीकडचं होतं. तिचं विश्वच हरवलं होतं. प्रकाशच्या प्रेमात ती इतकी गुरफटली होती की तो असेपर्यंत तिला आपल्या आजूबाजूला कोणी आहे की नाही याची आठवणही होत नव्हती. आता एकदमच सगळं उजाड झालं.

कंपनीकडून भरपाई मिळायची म्हणून ती मुंबईतच राहिली. आई तिच्याजवळ येऊन काही महिने राहिली. पण नंतर अंजीनं आईबरोबर गावी जाण्यास नकार दिला. इथं प्रकाशच्या आठवणी आहेत; मी ही खोली सोडून कुठंच जायची न्हाई. तिनं शेवटचं सांगून टाकलं.

एकाकी जीवन काय असतं ते ती अनुभवत होती. सासू-सासऱ्यांनी तर तिचं नावच टाकलं. तीही सगळ्यांशी फटकूनच राहिली. मिळालेल्या पैशांच्या व्याजावर कसंतरी चाललं पण ते अपुरं होतं. एकटा जीव असला, प्रिय माणूस कायमचं सोडून गेलं असलं तरी पोटाला भूक लागतेच; डोक्यावर छप्पर लागतं; अंगावर कपडा अन् त्यासाठी पैसेही लागतात; हे वास्तव तिला कळलं होतं. महागाई वाढतच होती. आता आपण काम करावं, हाच एक विचार पक्का होत होता. पण कुठे मिळणार काम? अर्धवट झालेल्या शिक्षणाचा काय उपयोग होता? कसलं कौशल्यही नव्हतं! एकच फक्त येत होतं. सैपाक. आजूबाजूच्यांनी, प्रकाशच्या मित्रांनी सुचवलं डबे देण्याबद्दल. गरजू खूप होते.

पण मी नेऊन कशी देणार डबे? णला चालत जाऊन वेळेवर डबे पोचवणं कसं जमणार ? तिनं पुष्पीच्या नवऱ्याला, सदाला विचारलं. तो प्रकाशचा मित्रही होता.

त्याची नको चिंता करू. काहीतरी हुईल सोय. सदा म्हणाला. त्यानंच दोघातिघांची चौकशी करून डबे ठरवलेदेखील. कामाला सुरवात तर झाली. सकाळी आणि

संध्याकाळी डबे द्यायला लागत. पहिल्यांदा सदानं आसपासच्या जरा मोठ्या मुलांना हाताशी धरलं. डबे पोहोचवण्यासाठी. पण त्यांचा भरोसा नव्हता. रोजची कटकट होऊ लागली.

एक दिवस एका मुलानंच गणाभाऊला अंजीकडे आणलं. त्याचं वय झालं होतं. पण खायची सोय नव्हती.

हो; मी रोज दोन्ही येळेस दीन की डबे.

पण सायकल आहे का तुमच्यापाशी?

आहे की. जुनी सायकल आहे. उद्या घिऊनश्यान येतो.

मी तुम्हालाएक वेळंचं जेवण दीन. आन् वर पैसे. चालेल?

गणाभाऊ जेवणावरच राजी होता. शिवाय पैसे म्हटल्यावर तो खूषच झाला. मुंबईत, करायचं असेल तर कुणालाही काम मिळतं हेच खरं!मग काय? अंजीचं किचन धडाक्यात सुरूच झालं. गणाभाऊ कष्टाला मागे हटत नव्हता. त्याचा प्रामाणिकपणा व खाडे न करता वेळ पाळण्याची सवय यामुळे अंजीनं त्याला दोन्ही वेळचं जेवण द्यायला सुरवात केली. तिचे ग्राहकही वाढले होते. हळू हळू घडी बसत होती. त्यातून एकटेपणावर मात करायला अंजी शिकत होती. लवकर उठून स्वयंपाक करणं, नऊ वाजता डबे गणाभाऊकडे सोपविले की भाजी किराणा इ.खरेदीला बाहेर पडणं हे नियमित करायला लागायचं. ते झालं की स्वत:चं जेवण. तोपर्यंत गणाभाऊ परत यायचा. तो डबा घेऊन घरी गेला की जराशी झोप. मग उठून परत संध्याकाळचा सैपाक.असं चक्र चालू झालं.

प्रकाशची आठवण मात्र पाठलाग करत असायची. दोघं सतत एकत्रच असायची. त्यामुळे प्रत्येक क्षणाशी निगडित अनेक आठवणी होत्या. लसणाची फोडणी घातलेली मेथीची भाजी त्याला किती आवडायची, रात्रीच्या जेवणाच्या वेळी तो तिला लाडाने घास कसा भरवायचा, फिरायला गेलं की गजरा कसा घेऊन द्यायचा, चौपाटीवरची भेळ खायला

घालायचा..... कितीतरी आठवणी. त्यांच्या प्रेमाच्या रात्रीच्या गोष्टी आठवून तर तिला कधी कधी रात्र रात्र झोप यायची नाही. अशावेळी डोळे पाझरू लागायचे. हे दुःख कोणाला सांगता येण्याजोगं नव्हतं. अगदी पुष्पीलाही नाही. रात्री अपरात्री पुष्पी अन् सदाच्या प्रेमालापाचे दबके आवाज कधीतरी ऐकू यायचे. त्यानेच तिला जाग यायची. मग नंतरची झोप? ती तर संपलेलीच असायची. मन अशांत व्हायचं; अन् देह भाजून निघतोय् असं वाटायचं.

किती दिवस आपली ही छळणूक होणार? ती स्वतःशीच बोलायची. दुसरं मन सांगायचं, अगं, आता ही छळणूक कायमचीच की. प्रकाश काय आता परत येणारै व्हय्?मग पहाटेपर्यंत डोळ्यातून कितीही पाणी सांडलं तरी तगमग कमी होत नसे.

त्यादिवशी असंच झालं. कसंबसं उठून तिनं सैपाक केला. नेहमीप्रमाणे गणाभाऊ आला. डबे उचलून सायकलला लावू लागला. दुसऱ्या बाजूला हँडल ला लावायचे डबे आणायला आत आला अन् तिकडे धपकन् आवाज आला. डब्यांची पिशवी फूटपाथवर आडवी झाली होती. अन्न इकडे तिकडे सांडलं होतं. आता ते रस्त्यावरचं अन्न कोणाच्या उपयोगाचं होतं? आता काय पुन्हा सैपाक करायचा? चार पाच जणांना आता उपाशीच कामावर जावं लागणार! क्षणार्धात हे सर्व विचार अंजीच्या डोक्यात थैमान घालून गेले. आधीच मूड नव्हता..

ती गणावर खेकसू लागली, ओ गणाभाऊ, काय समजतं का न्हाइ तुमाला? असं कसं, नीट सायकल न लावता आत आले तुमी?समदं वाया गेलं नं! अता आयत्या येळेला मी काय करनार? पुन्ना माजा सैपाक व्हईपरेंत काय लोकं कामाला जायची राहतिन् व्हय्? तुमाला काय बी सुधरत न्हाई आता. सोडून द्या काम आन् माजं नुस्कान तरी वाचवा....

हे आणि आणखी बरंच काही ती सपाट्यात बोलून गेली. गणाभाऊ न बोलता राहिलेले डबे घेऊन चालता झाला.तोही मनात नाराज झाला होता. तिच्या शब्दांनी तर दुखावला होताच; अन् विचार करत होता स्वत:च्या अगतिकपणाचा. वय झालं होतं. काम झेपत नव्हतं. पण गाठीला पैसा नव्हता. शिक्षणही नव्हतं.काय करणार? पैसा कधीच नव्हता; त्यामुळे गावाला बायको मुलं होती ती विचारत नव्हती. बायकोनं एकटीनं तिच्या जिवावर त्यांना मोठं केलं होतं. शाळा शिकवली होती. आता मुलीचं लग्न झालं होतं. दुसरा तिथंच शेतावर रोजंदारीनं काम करत होता अन् धाकटा अजून शिकत होता. मोठ्या भावानं त्याच्या कॉलेजचाही खर्च पेलला होता. पण गणाची दखल कोणीच घेत नव्हतं.

पुढले आठ-दहा दिवस नेहमीसारखेच पार पडले. गणा स्वत:शी विचार करत होता. कोण आपल्याला मदत करणार? मग त्याला स्वत:च्या बहिणीची आठवण झाली. त्यानं बहिणीला पत्र पाठवलं. कोणाकडून तरी लिहून घेऊन. आणि काय आश्चर्य! बहिणीचं लगेच उत्तरही आलं. तिचा मुलगा नुकताच बारावी झाला होता. फारसं डोकं नव्हतं. पुढे शिकण्यात रसही नव्हता. आणि मामासारखं मुंबईत काम करीन असं वेड होतं. तिथं राहिलं की हवे तेवढे सिनेमे बघता येतील आणि कुठे जमलं तर सिनेमात काम मिळवता येईल. झाडूवाल्याचं मिळालं तरी चालेल... पुढचं पुढे.. असं त्याचं म्हणणं होतं. त्याच्या आईनं लिहिलं होतं, कामाला मागे हटायचा नाही माजा नित्या. तुला मदत बी करन. मात्र तू त्याच्यासाटी काम बघ.

ही बातमी गणाभाऊच्या पथ्यावरच पडली. लगोलग त्यानं उत्तर धाडलं, नित्याला पाठवून दे. पुडचं मी बघंल.

नित्या येऊन दाखल झाला. गणानं विचारलं, काही पैसं-आडकं आनलंस का न्हाई संगती? मुंबैत खिशात पैकं लागतात..

नित्यानं पाच हजार आणल्याचं सांगितलं. गणा मनोमन खूश झाला. नित्याला त्यानं टपरीवर नेऊन मस्त मटणाचं जेवण घातलं. तोही खूप दिवसांनी पोटभर मनासारखं जेवला. दुसऱ्या दिवसापासून नित्या मामाबरोबर तो जाईल तिथं जाऊ लागला. दुसरं काम मिळेपर्यंत तरी हाच एक मार्ग होता.

नऊ वाजता अंजीकडे दोघं आले. हा कोनवं, गनाभाऊ? तिनं विचारलं.

हा माजा भाचा; भईनीचा मुलगा.

आसं व्हय्!मंग? इतकं दिवस बोलला न्हाईत? तुमालाकोन कोन हाय, ते ?

गणा गप्पच राहिला. गणा बरोबर नित्याच्याही डबे पोहोचविण्याच्या फेऱ्या सुरू झाल्या. नित्याला घरं माहीत झाली तशी तो म्हणाला, मामा मी जातो डबे घेऊन. तू नको सायकल ताबडवूस. इथंच थांब.

गणाला मनात हायसं वाटलं. त्याला हेच तर हवं होतं. पण असं काही नेहमीच चालणार नव्हतं. एकतर नित्या कामासाठी मुंबईत आला होता. त्याच्या मनाजोगतं काम शोधायला हवं होतं. गणा मनात विचार करत होता, मी कुठं काम शोधणार बापडा? इथं राहून राहून त्याच्याच ओळखी झाल्यावर होईल काहीतरी. बघू....

नित्याही मनाशी म्हणत होता, मामाकडून काय होणार? मी आल्यापासून बघतोय, तोच आता किती थकलाय्. मला काय तो काम शोधायला मदत करणार! त्यालाच माझ्या मदतीची गरज आहे. पण मग माझं सिनेमाचं स्वप्न? त्या जगात शिरकाव मिळायला हवा. कसा बरं? आता मलाच काहीतरी खटपट केली पाहिजे......

काही दिवस गेले. नित्याची ओळख एका हॉटेलवाल्याशी झाली होती. त्यानं सांगितलं की त्याचं हॉटेल छोटं असलं तरी काही सिनेमावाले तिथं येऊन काही गप्पा

मारत बसतात. निवांत असतं म्हणून. नित्यानं ठरवलं, हॉटेलवाल्याशी ओळख वाढवायची..

एके दिवशी अंजी पुन्हा काळजीत पडली. नऊ वाजून बराच वेळ होऊन गेला. गणाचा अजून पत्ता नव्हता. अंजी आतल्या आत धुमसत होती. तिच्या आत-बाहेर येरझारा चालल्या होत्या. तेवढ्यात कोपऱ्यावर नित्या वळतांना दिसला. तिनं डबे बाहेर आणायला सुरवात केली. तो आल्यावर तोंडाचा पट्टा चालू झाला.

का रं मुड्द्या, झोप संपत न्हाई होय तुजी अन् तुझ्या मामाची? फुकट जेवायला मिळतंय् ना! मी आपली पहाटेला उठून मर मर मरते, अन् तुम्ही उशीरा डबा न्या! माझं गिऱ्हाइक तुटू द्या. मी उपाशी राह्यले, तर तुम्हाला आयतं मिळंल का रं?

काही न बोलता नित्या सायकलवर टांग मारून निघाला. डबे देऊन, त्याचा अन मामाचा डबा न्यायला परत आला तोपर्यंत अंजीचा पारा खाली आला होता. ती त्याला म्हणाली, बस! तरी तो उभाच राहिलेला पाहून खेकसली,

ऐकायला आलं का न्हाय?

तो जवळच्या स्टुलावर बसला. काय झालं मामाला तुज्या ?

कालपास्नं ताप आहे त्याला. रात्रभर झोप नाही दोघांनाही.

आसं सांग की, मंग! मी कशाला ओरडले असते मघाशी तू तोंड उचकटलं असतं तर!

अंजीनं आत जाऊन पैसे आणले. त्याच्या हातावर ते ठेवून ती म्हणाली, हे घे; आणि दाक्टरकडे ने त्यांनला. कळलं?

अंजीच्या आवाजातला तो हुकूमच होता, हे नित्याला समजलं. तिचं ऐकणं त्याला भागच होतं. कारण तिच्यामुळे तर तो जेवत होता! तो मामाकडे रहायला आल्यापासून अंजीनं जास्तीचं जेवण द्यायला सुरवात केलीच होती शिवाय पैसेही वाढवले होते. तिचं तसं बरं चाललं होतं, हे एक; आणि गणाच्या म्हतारपणामुळे तिला त्याची दया यायची, हे दुसरं.

असे दिवस चालले होते. नित्या नशीबवान ठरला. त्या हॉटेलवाल्यानं त्याला एका सिनेमावाल्याची ओळख करून दिली होती. त्याला तो नक्की काम देणार होता. पण आधी पडद्यामागचं काम मिळेल, म्हणाला. नित्याची हरकत नव्हतीच. फक्त त्याला चार चांगले कपडे हवे होते आणि एक बरी सायकल! पण आता नित्याजवळचे पैसे थोडेच उरले होते. काय करावं? अंजी देईल का ॲडव्हान्स?पण तिच्याकडे मागितलेलं मामाला नाही आवडणार! त्यानं हॉटेलवाल्याकडे शब्द टाकून पाहायचं ठरवलं. दैव नित्याला चांगलंच साथ देत होतं.

आणि एक दिवस नित्याचा रुबाबच बदलून गेला! मुळातच तसा स्मार्ट असलेला नित्या एखाद्या हीरोसारखा भासायला लागला. आरशात पाहून तो स्वत:वरच खूश झाला. दुसऱ्या दिवशी डबे घ्यायला गेला, तो अंजी त्याच्याकडे पाहातच राहिली!

तो इतका आनंदात होता की त्यानं तिला सगळं सांगून टाकलं. त्याला स्टुडिओ मधे काम करून शिकायला मिळणार होतं. आज तो त्या सिनेमावाल्याबरोबर जाणार होता. पण तो अंजीला म्हणाला, तुम्ही काळजी करू नका. मी संध्याकाळी डबे द्यायला नक्की येतो! सकाळचे डबे देऊन तो तसाच त्याला भेटायला जाणार होता.

अंजीला वाटलं याला तिकडे काम मिळाल्यावर हा डबे वेळेवर कसे देणार? मग आहेच पुन्हा गणाभाऊ!

दुपारचा सैपाक झाला. डबेही भरून झाले. घड्याळ पुढे सरकत होतं. नित्याचा पत्ता नव्हता. संध्याकाळ झाली. अंजीचा राग हळूहळू वाढू लागला. नित्या आला नव्हता. पण डबे तर वेळेवर पोचायला हवेत!

अंजीनं पुष्पीला हाक दिली. आता ग? काही सुचं ना बघ! अंजी तिला म्हणाली.

काळजी करू नगंस, थांब . पुष्पीनं तिला दिलासा दिला. ती तिच्या खोलीत गेली. पाच मिनिटातच सदा तिच्याबरोबर बाहेर आला. अंजीलाम्हणाला,

आण; आज मी देऊन येतो. मला म्हाईत आहेत घरं. पण मी पायानं जाणार; हुईल जरा उशीर. पण रातच्या डब्याला चालतोय्!

सदा डबे घेऊन निघून गेला. अंजीला त्याचे उपकार कसे फेडू असं वाटत होतं. ती अन् पुष्पी थोडा वेळ बोलत बसली. अजूनही नित्या आला नव्हता. सदानं डबे परतही आणून दिले. अंजी नित्याची वाट बघत बसली. तो आल्यावरच जेऊ असं तिनं ठरवलं.

बऱ्याच वेळानं नित्या आला. दार किलकिलंच होतं. त्याच्या चेहऱ्यावरनंच कळत होतं की काहीतरी बिनसलं होतं.

काय रं? काय झालं? तुझा चेहरा का असा झालाय् ? भेटला का तुझा त्यो मानूस?

स्टुलावर बसलेल्या नित्याची मानही वरती झाली नाही. आरं, बोलशील का नाही कायतरी!

अंजीच्या शब्दांनी नित्याचा अडवून धरलेला बांध फुटला. तो स्फुंदून स्फुंदून रडू लागला. रडत रडतच म्हणाला,

त्या माणसानं फसवलं मला. काल माझ्याकडली अंगठी अन् चेनही त्याला काढून दिली मी. त्यानं मागितली म्हणून.

हॉटेलवाला आता म्हणतो तू कशाला दिलीस म्हणून. हे लोक असेच असतात म्हणे!

नित्याला जबरदस्त धक्का बसला होता. अंजीनं त्याच्या खांद्यावर हात ठेवला. ती त्याची समजूत घालू लागली. पण तो हमसून हमसून अधिकच रडत होता. या बेरकी शहरात आपण बावळट ठरलो, याची बोच लागून तो आणखीनच दु:खी होत होता.

अंजीला राहवलं नाही; तिनं त्याला शांत करण्याच्या उद्देशानं त्याचं डोकं आपल्या छातीशी धरलं. त्याच्या पाठीवरून ती हात फिरवू लागली.....आणि एकाएकी काय झालं कोणास ठाऊक, त्यानं तिला एकदम घट्ट मिठी मारली. रडणं चालूच होतं. आपलं डोकं तो तिच्या छातीवर घुसळत होता. काय होतंय हे कळायच्या आतच तिच्या ब्लाऊजची बटणं तटातट तुटली. तिनं त्याचं डोकं गच्च दाबून धरलं. तिचं भान आता सुटत चाललं होतं. एका पुरुषाचा तो स्पर्श तिला सुखानं बधीर करून टाकत होता.. तिचं शरीर ज्यासाठी तळमळत होतं ते असं अचानक.....!

तिनं त्याला आणखी जवळ घेतलं.....पुढे काय झालं हे दोघांनाही कळलं नाही.....जेव्हा दोघं भानावर आले तेव्हा सदाच्या घरातल्या घड्याळाचे बारा ठोके पडले. अंजी उठून बसली. तिनं स्वत:ला नीटनेटकं केलं. नित्यानं तिच्याकडे पाहिलं, ती पाठमोरी होती. नित्यानं मागून तिला घट्ट मिठी घातली. आता त्या मिठीत तिला अधिकार जाणवला. तिच्या कानाशी तो म्हणाला, खूप सुंदर होता हा पहिला अनुभव....मला वाटलं नव्हतं तू आणि मी हे असे.....पण मी गुन्हा केला असं तुला वाटत असेल तर ....... पुढे काहीच न बोलता दोघांनी परस्परांना एकमेकांच्या मिठीत झोकून दिलं......

हळूच दार उघडून नित्या बाहेर पडला. तिची झोप उडाली होती. प्रकाशचा अपराध केलाय् मी, या भावनेनं उशीत तोंड लपवून तिनं भरपूर रडून घेतलं. चार चे टोल पडले तशी ती उठून नेहमीप्रमाणे सैपाकाला लागली....तेव्हाही ती कमालीची अस्वस्थ होती. आता डबे कसे पोहोचविणार प्रश्नच होता....कालच्या प्रकारानंतर नित्यालाही पश्चात्ताप होत असणार हे तिला माहीत होतं....

डबे भरून ती बाहेर येऊन उभी राहिली. पाचच मिनिटं झाली असतील; समोरून नित्या येतांना दिसला. ती का कुणास ठाऊक पण आत वळली. सायकल फुटपाथशी लावून तो आत आला.

तू आलास? मला वाटलं .... ती अडखळली.

का? तुला वाटलंमी येणार नाही? मी आलो नाही तर तुला मदत कोण करणार?

तो तिच्याकडे पाहून अर्थपूर्ण हसला आणि तिनंदेखील त्याच्या दंडाला धरून म्हटलं, जा आता. उशीर होतोय्.....!

****